साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/ छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
खवय्यांसाठी खास पंजाबी
छोले भटूरे
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
पार्सल सुविधा उपलब्ध..
एल.जी.शोरूम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
* कॉन्टयूरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा
दृष्टी साजरी करा
Help line 9112288611 / 8888982222

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. ०१.०४.२०२६ | अंक नं. ००१ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
१०१ भाग्यवंत जोडप्यांना चक्क FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी.
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹888/-*
Conditions Apply*
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज



क्षणो क्षणी आमच्या मनी तुमची आहे आठवण, हीच आमच्या आयुष्यातील अनमोल साठवण
भावपूर्ण श्रद्धांजली
कै.हरिभाऊ भाऊ झावरे
दशक्रिया विधी
देवाज्ञा : मंगळवार दि.२४ मार्च २०२६
दशक्रिया : गुरूवार दि.०२ एप्रिल २०२६ स.८:०० वा.
: शोकाकुल :
नंदकुमार झावरे पाटील मल्टीस्टेट को.-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.अहिल्यानगर
चेअरमन, व्हा. चेअरमन, सर्व संचालक मंडळ, कर्मचारी वृंद, सभासद, ठेवीदार, कर्जदार व हितचिंतक
: ठिकाण : भोंद्रे, ता.पारनेर, जि.अहिल्यानगर

|| जय श्रीराम ||
श्री हनुमान जन्मोत्सव
महाप्रसाद व महाआरती
जन्मोत्सव स. ६.०० वाजता
महाप्रसाद स. ११.०० वा.पासुन
महाआरती सायं. ७.०० वाजता
गुरुवार, दि. ०२ एप्रिल २०२६ रोजी
• स्थळ •
श्री संकटमोचन हनुमान मंदिर
नगर-छत्रपती संभाजीनगर रोड, तारांगण समोर, धनगरवाडी, अ.नगर.
आयोजित करण्यात आले आहे. तरी सर्व भाविकांनी लाभ घ्यावा, ही नम्र विनंती
• महासंध्या आरती शुभहस्ते •
गुरुवर्य श्री राजाभाऊ कोठारी — अध्यक्ष, मंगलभक्त सेवा मंडळ
मा.आ. संग्रामभैय्या जगताप — विधानसभा सदस्य, महाराष्ट्र राज्य
• प्रमुख उपस्थिती •
मा.श्री. अक्षयदादा कर्डिले — जिल्हाध्यक्ष, भाजपा, युवा मोर्चा
मा.श्री. संदीपदादा कर्डिले — मा.संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती
• आयोजक •
श्री संकटमोचन हनुमान सेवा ट्रस्ट



जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# नगरच्या तांदूळ व्यापाऱ्याची सव्वा कोटींची फसवणूक

## चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – शहरातील गणेशवाडी भागात राहणाऱ्या एका व्यापाऱ्याची जादा नफ्याचे आमिष दाखवून तब्बल १ कोटी ११ लाख ६० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पियुष संजय शिंगवी यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी शिंगवी यांना आरोपी सतिष सिद्रप्पा कोरी, अथर्व अशोक कोरी (दोघे रा. पुणे), सुमेध सुभाष बसवड (रा. डोंबिवली) आणि प्रकाश सरजू तंडन (रा. छत्तीसगड) यांनी संगनमत करून व्यवसायात मोठ्या नफ्याचे आमिष दाखवले. आरोपींनी विविध बनावट कागदपत्रे तयार करून शिंगवी यांचा विश्वास संपादन केला. या विश्वासाचा फायदा घेत आरोपींनी त्यांच्याकडून १ कोटी ७ लाख रुपये किमतीचा तांदूळ घेतला. इतकेच नव्हे तर, हा माल पोहोचवण्यासाठी आणखी ४ लाख ६० हजार रुपये ऑनलाइन स्वरूपात उकळले.

माल घेऊनही त्याचे पैसे न देता आणि दिलेली आश्वासने न पाळता आरोपींनी शिंगवी यांची फसवणूक केली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच शिंगवी यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार गणेश देशमुख आणि पोलीस हवालदार गाजरे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# अभिनेता शरद पोंक्षे आणि मनुस्मृतीच्या प्रतिमेचे अहिल्यानगरमध्ये दहन, काळे फासण्याचा इशारा


अभिनेता शरद पोंक्षे यांनी मनुस्मृतीच्या संदर्भात केलेल्या वादग्रस्त विधानाचा अहिल्यानगरमध्ये तीव्र निषेध करण्यात आला. वंचित बहुजन आघाडी आणि भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने आयोजित या आंदोलनात कार्यकर्त्यांनी शरद पोंक्षे आणि मनुस्मृतीच्या प्रतिमेचे दहन करून संताप व्यक्त केला.

नगर – अभिनेता शरद पोंक्षे यांनी मनुस्मृतीच्या संदर्भात केलेल्या वादग्रस्त विधानाचा अहिल्यानगरमध्ये तीव्र निषेध करण्यात आला. वंचित बहुजन आघाडी आणि भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने आयोजित या आंदोलनात कार्यकर्त्यांनी शरद पोंक्षे आणि मनुस्मृतीच्या प्रतिमेचे दहन करून संताप व्यक्त केला. आंदोलनाची सुरुवात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आणि सामूहिक अभिवादन करून करण्यात आली.

जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांनी यावेळी बोलताना पोंक्षे यांच्यावर गोबर भक्त अशी टीका करत अत्यंत परखड भूमिका मांडली. ते म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या काळात मनुस्मृती जाळली होती, त्या ऐतिहासिक घटनेचा अवमान करण्याचे काम पोंक्षे यांनी केले आहे. मनुस्मृती हे केवळ एक पुस्तक नसून ते विषमतेचे आणि गुलामगिरीचे प्रतीक आहे, असे साठे यांनी यावेळी निक्षून सांगितले. यावेळी ते पुढे म्हणाले, ज्या ज्या वेळी शरद पोंक्षे सारख्या व्यक्ती महापुरुषांच्या विचारांची प्रतारणा करतात, तेव्हा इथले आंबेडकरवादी शांत का बसतात? तुम्ही बाबासाहेबांच्या नावाचा उपयोग फक्त स्वतःच्या स्वार्थासाठी आणि राजकारणासाठी करता का? त्यांनी इशारा दिला की, जर पोंक्षे यांनी माफी मागितली नाही, तर अहिल्यानगर जिल्ह्यात त्यांचे कोणतेही कार्यक्रम होऊ दिले जाणार नाहीत आणि दिसल्यास त्यांना काळे फासले जाईल.

भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र साळवे यांनी स्पष्ट केले की, मनुस्मृतीने बहुजन समाजाला गुलामगिरीत ठेवले होते, तिचे समर्थन खपवून घेतले जाणार नाही. प्रशासनाने पोंक्षे यांच्या कार्यक्रमांना परवानगी देऊ नये, अन्यथा होणाऱ्या परिणामांना प्रशासन जबाबदार राहील. शहराध्यक्ष दीपक पाटोळे यांनी पोंक्षे यांच्या अभ्यासावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, आधी मनुस्मृती नीट वाचा आणि मगच महामानवांच्या कृतीवर भाष्य करा, असा सल्ला दिला.

हे आंदोलन योगेश साठे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि राजेंद्र साळवे यांच्या नेतृत्वाखाली पार पडले. यावेळी योगेश क्षीरसागर, राजीव भिंगारदिवे, मनोज साळवे, अमर निर्भावाने, संदीप वाघमारे तसेच भारतीय बौद्ध महासभेचे शहराध्यक्ष दीपक पाटोळे, गोरख केदारे, रवींद्र कांबळे, दीपक गायकवाड, वसंत मेघदंबर, मोहन शिरसाठ, गौतम पाचारणे, अविनाश राक्षे, युवराज बनसोड, राहुल कांबळे, राहुल पडागळे व इतर कार्यकर्ते उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो आणि मनुस्मृती मुर्दाबाद अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.


अहिल्यानगर येथे महाराष्ट्र प्रदेश ख्रिश्चन सेल, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्रजी पवार पक्ष) यांच्या वतीने गुड फ्रायडे व इस्टर निमित्त चर्चांना पोलीस संरक्षण देण्याची मागणी करताना प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब साळवे यांनी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना निवेदन सादर केले. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. (छाया : समीर मन्यार)

# गुड फ्रायडे व इस्टर निमित्त नगर जिल्ह्यातील सर्व चर्चेसला पोलीस संरक्षण देण्यात यावे

नगर – आगामी गुड फ्रायडे (उत्तम शुक्रवार) व इस्टर संडे (येशू ख्रिस्त पुनरुत्थान दिन) निमित्त जिल्ह्यातील सर्व चर्चांना कडक पोलीस संरक्षण देण्याची मागणी महाराष्ट्र प्रदेश ख्रिश्चन सेल, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्रजी पवार पक्ष) यांच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना ख्रिश्चन सेलचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब साळवे यांनी निवेदन सादर केले.

यावेळी राजू भिंगारदिवे, विजय साताळकर, विनायक पंडित, राजू पारदे, राजेश शिंदे, किरण पगारे, अशोक पठारे, मनोज शिंदे, किरण ठोंबरे, विल्यम साठे, वैभव जाधव, शंभू विल्यम, शमुवेल पाचरणे, मधुकर नेटके, लवेश नेटके, कारभारी साठे, क्रिश भुजबळ, शोभा पातारे, संजय भिंगारदिवे आदी उपस्थित होते.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, ३ एप्रिल (गुड फ्रायडे) व ५ एप्रिल (इस्टर संडे) रोजी जिल्ह्यातील विविध चर्चमध्ये पहाटेपासून धार्मिक विधी व प्रार्थना कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमांना श्रद्धाळू उपस्थित राहण्याची शक्यता असून, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस बंदोबस्त आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे.

यामध्ये चर्च ऑफ नॉर्थ इंडिया, रोमन कॅथोलिक, साल्व्हेशन आर्मी, विश्ववाणी, बिलिव्हर्स चर्च तसेच इतर चर्चमध्ये कार्यक्रम होणार आहेत. कोणत्याही समाजकंटकांकडून अडथळा निर्माण होऊ नये व धार्मिक सौहार्द कायम राहावे यासाठी प्रशासनाने विशेष दक्षता घ्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

ख्रिश्चन समाज शांतताप्रिय असून सर्व धार्मिक कार्यक्रम निर्विघ्न पार पडावेत यासाठी प्रशासनाने तात्काळ सर्व पोलीस ठाण्यांना आवश्यक त्या सूचना देऊन योग्य तो बंदोबस्त उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

दरम्यान, या निवेदनाची प्रत महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक, नाशिक विभागाचे विशेष पोलीस महासंचालक तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार यांनाही पाठविण्यात आली आहे.

## अरुणाबाई गांधी यांचे संथारा व्रतात निधन

नगर – आगरकर मळा येथील अर्बन बँक कॉलनीतील



रहिवासी श्रीमती अरुणाबाई श्रीकांत गांधी (वांबोरीवाला, वय ७६) यांचे १ एप्रिल रोजी संथारा व्रतात निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, ३ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. स्व. श्रीकांत गांधी यांच्या त्या पत्नी व विजयकुमार गांधी यांच्या भावजय तर किशोर कासवा यांच्या बहीण होत.

## संशयास्पद रित्या वावरणाऱ्या तरुणावर गुन्हा दाखल

नगर – तोफखाना पोलीस स्टेशनच्या हद्दीत संशयास्पद रित्या स्वतःचे अस्तित्व लपवून वावरणाऱ्या एका तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडून घरफोडीसाठी वापरले जाणारे साहित्य जप्त करण्यात आले असून, याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तोफखाना पोलीस स्टेशनचे अंमलदार अविनाश अशोक बडे हे पोलीस पथकासह गस्त घालत होते. ३१ मार्च रोजी रात्री ११ वाजेच्या सुमारास गंगा उद्यान परिसरातील ओढ्याकाठी एका झाडाझुडपात त्यांना एक व्यक्ती संशयास्पदरीत्या हालचाली करताना दिसून आली. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याची विचारपूस केली असता, त्याने आपले नाव मोहम्मद इमरान अब्दुल हमीद काझी (वय ३८, रा. मालेगाव, जि. नाशिक) असे सांगितले. यावेळी त्याची झडती घेतली असता, त्याच्याकडे घरफोडी किंवा चोरीच्या उद्देशाने वापरले जाणारे स्क्रू ड्रायव्हर आणि कटर असे साहित्य मिळून आले. सूर्यास्तानंतर निर्जन स्थळी स्वतःची ओळख लपवून गुन्हेगारी उद्देशाने थांबल्याप्रकरणी पोलीस नाईक अविनाश बडे यांनी फिर्याद दिली. या फिर्यादीवरून आरोपी मोहम्मद इमरान काझी याच्यावर मुंबई पोलीस कायद्यानुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांच्या मार्गदर्शनाखाली अरुण गांगुर्डे करत आहेत.

## कांतीलाल गांधी यांचे हृदयविकाराने निधन

नगर – कासार पिंपळगाव (ता.पाथर्डी) येथील रहिवासी



कांतीलाल हजारीमल गांधी (वय ७०) यांचे ३१ मार्च रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १ एप्रिल रोजी कासार पिंपळगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. छाया गांधी यांचे ते पती तर हेमंत, जयदीप गांधी व राखी पोखर्णा यांचे वडील होत. कासार पिंपळगावचे हेमंत प्रोव्हिजन स्टोअर्सचे ते संचालक होत.




श्रीपाद छिंदम याला तात्काळ जिल्ह्यातून हद्दपार करावे याबाबत पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना निवेदन देताना नगरसेवक मयुर बांगरे आदी. शेजारील छायाचित्रात श्रीपाद छिंदम याच्या फोटोला बूट मारुन निषेध व्यक्त करण्यात आला.

## डॉक्टर सुभाष म्हस्के यांचे दु:खद निधन

नगर – शहरातील काकासाहेब म्हस्के शैक्षणिक संकुलाचे



संस्थापक तथा कार्यकारी विश्वस्त डॉ. सुभाष किसनराव म्हस्के (वय ८०) यांचे १ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता त्यांच्या राहत्या घरी दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, दोन मुली, जावई, सून व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर १ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

डॉ. म्हस्के हे सावेडी रोडवरील म्हस्के एक्सीडेंट हॉस्पिटलचे प्रमुख होते. आपल्या दीर्घ कारकिर्दीत त्यांनी गरजू रुग्णांना सेवा देत वैद्यकीय क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली होती.

# श्रीपाद छिंदम याला तात्काळ जिल्ह्यातून हद्दपार करावे

## नगर शहरात फ्लेक्स वरील छायाचित्राला बूट मारुन निषेध

नगर – महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषयी अपशब्द वापरणारा तसेच अहिल्यानगर शहरात जिहादी प्रवृत्ती उराशी बाळगून उजळ माथ्याने फिरत असलेला श्रीपाद छिंदम यावर तात्काळ जिल्ह्यातून हद्दपार करण्याची कार्यवाही करावी, असे निवेदन अशी मागणी जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याकडे नगरसेवक मयुर बांगरे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

मार्च महिन्यात झालेल्या मनपा अर्थसंकल्पाच्या बैठकी प्रसंगी सभागृहात बोलत असताना आम्ही श्रीपाद छिंदम याचा विरोध केला होता त्यास प्रतिउत्तर म्हणून त्याने आपल्या कार्यालयात तक्रार अर्ज केले आहेत आणि त्या अनुषंगाने आपण त्यास सशस्त्र संरक्षण देणार असल्याबाबतचे ऐकिवात आहे.

ज्या छिंदमला पोलीस प्रशासनाने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती करण्यास प्रतिबंध करत २४ तासासाठी हद्दपार केले होते तरी पण पोलीस प्रशासनाच्या नाकावर टिच्चून दिल्लीगेट येथे त्याने भव्य स्वरूपाचा कार्यक्रम घेतला आणि प्रशासनाच्या नोटीसला वाटाण्याच्या अक्षता लावल्या अशा प्रवृत्तीला जिल्ह्यात राहण्याचा अधिकार आहे का ?

छिंदम हा जिहादी मानसिकतेचा असून जिहादी गैर कृत्य करणाऱ्या गुंड व्यक्तींसोबत उठ बस करीत असतो तो पूर्वीचा गुन्हेगारच आहे. त्याच्यावर महाराष्ट्रभर गुन्हे दाखल असून तो आजही दोन समाजात तेढ निर्माण करून शहरात आणि जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करू शकतो. अशा जिहादी प्रवृत्तीच्या गुन्हेगाराला पोलीस प्रशासन जर संरक्षण देणार असेल तर कायदा व्यवस्थेचे बारा वाजलेच म्हणून समजावे का ? छिंदमला जर आपण संरक्षण दिले तर जिल्हा पोलीस प्रशासनाविरोधात सर्व शिवप्रेमी आंदोलन करतील.

या सर्व गोष्टींबाबत जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी गांभीर्यपूर्वक विचार करावा व जिल्ह्याची शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी श्रीपाद छिंदम यास तात्काळ जिल्ह्याबाहेर हद्दपार करावे, अशा मागणीचे निवेदन नगरसेवक मयुर बांगरे यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक यांना दिले आहे.

निवेदनावर नगरसेवक अमोल येवले, शंतनू गाडळकर, ज्ञानेश्वर कवडे, शरद ठुबे, निलेश सुंबे, दिनेश जोशी, भागवत कुरधने, संभाजी पवार, संदेश इंगळे, कृष्णा पेठारे, प्रशांत हाथरुणकर, मनोज नन्नवरे, आदेश बचाटे, जगदीश घेवारे, अविनाश पाटील, योगेश इंगळे, निलेश बांगरे, गौरव कारले, तुषार बोरकर, राहुल शेलार, प्रेम कोहोक, मयुर जाधव, दीपक डोंगरे, शुभम जोसेफ, धनू चव्हाण, सुरज आकसे, सागर ताकवाले, संतोष हुलगे, अभिषेक नन्नवरे, शुभम गायकवाड, वैभव भोवरे, अभय सोनवणे, शिवम सुर्यवंशी, नितीन तिंभोरे आदींच्या सह्या आहेत.



## हनुमान चालिसा पाठ

**गुरुवार दि. २/४/२०२६**
**रात्री ८.३० ते १०.३०**

**श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर**

**हनुमान जन्मोत्सव**, दक्षिणमुखी हनुमान मंदिर, सर्जेपूरा, वेळ : सकाळी ६.१० वा.
**शनि-मारुती मंदिर**, माळीवाडा, विशाल गणपती मंदिर ट्रस्ट माळीवाडा वेश, सर्व सेवेकरी वृंद, परदेशी परिवार

**मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एम.आय.डी.सी.**

**मंगल भक्त सेवा मंडळ**, मंगल दत्तक्षेत्र, एफ-७०, एमआयडीसी, किर्तीकुमार कोठारी, ९४२२२२६८२५

**श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडळ, सारडा लेन, गंजबाजार**

**हनुमान जन्मोत्सव**, पुर्णाहुती – सकाळी ८ ते ११ वा. महप्रसाद – दुपारी १२ ते २ वा. कार्यक्रम स्थळ : महेशनगर, जुन्या आरटीओ कार्यालयाच्या जवळ, छत्रपती संभाजीनगर रोड


**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट) नवीपेठ**

**हनुमान जन्मोत्सव**, नगरसेवक बाळासाहेब मारुतीराव बोराटे, ब्राह्मणगल्ली, माळीवाडा

**श्री संकट मोचन हनुमान मंडळ, श्री रामदेवरा दरबार, सारसनगर**

**दत्तात्रय नामदेव एकशिंगे**, आयोध्या नगर फेज-२, भारत बेकरी जवळ, नागापूर ९८५०००९५८६
**श्री हनुमान जन्मोत्सव**, सकाळी ६.३० वा. श्री रामदेवरादरबार, सारसनगर

# ‘साकळाई’ उपसा सिंचन योजनेला मंत्रीमंडळाची मान्यता, १,२३४. १३ कोटी रुपये खर्चून पुढील ४ वर्षांत होणार पूर्ण



नगर – श्रीगोंदा व अहिल्यानगर तालुक्यातील ३२ गावांसाठी महत्त्वपूर्ण असणाऱ्या साकळाई उपसा सिंचन योजनेस अखेर मंत्रीमंडळाची मान्यता मिळाली. १ एप्रिलला झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत या योजनेस मंजुरी देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ७ वर्षांपूर्वी दिलेला शब्द यानिमित्ताने पूर्ण केला. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी या कामासाठी केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले.

अहिल्यानगर जिल्ह्यातील नगर तालुका व श्रीगोंदा तालुक्यातील ३२ दुष्काळी गावांसाठीच्या साकळाई योजनेची चर्चा गेल्या अनेक पिढ्यांपासून सुरु होती. या योजनेतून या दोन्ही तालुक्यातील ९,६०० हेक्टर क्षेत्राला पाणी देण्याचे नियोजन होते. या योजनेच्या नावाखाली अनेक निवडणूका लढविल्या गेल्या. परंतु प्रत्यक्षात ही योजना पूर्ण झाली नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १६ एप्रिल २०१९ ला वाळकी येथे झालेल्या जाहीर सभेत साकळाई योजनेला मंजूरी देण्याचा शब्द दिला होता. त्यानंतर राधाकृष्ण विखे पाटील यांनी जलसंपदा मंत्रीपद मिळाल्यानंतर या योजनेच्या कामाचा विशेष पाठपुरावा केला.

आता ही योजना १,२३४. १३ कोटी रुपये खर्चून पुढील चार वर्षांत पूर्ण केली जाणार आहे. साकळाई उपसा सिंचन योजनेअंतर्गत म्हैसगाव येथून ४ टप्प्यांत पाणी उचलून ते श्रीगोंदा व नगर तालुक्यातील ३२ गावांना दिले जाणार आहे. त्यातून लघू पाझर तलाव, पाझर तलाव, सिमेंट नाला बंधारे, गाव तळे भरुन घेतली जाणार आहेत. या योजनेसाठी १.६० टिएमसी पाणी सिंचनासाठी व ०.२० टीएमसी पाणी हे पिण्यासाठी देण्याचे नियोजन आहे. खरीप हंगामात १५ जुलै ते १५ ऑक्टोंबर या काळात पाणी उपसा करुन जलसाठ्यांचे पुनर्भरण केले जाणार आहे. यासाठी म्हैसगाव येथे तत्काळ पंपगृह बांधण्यात येणार आहे. त्यानंतर इतर तीन पंपगृहही बांधले जाणार आहेत. चार पंपगृह व तीन वितरींकाद्वारे एकूण चार टप्प्यात हे काम पूर्ण केले जाणार आहे. हे पाणी तब्बल २०८.३४ मिटर उपसा करुन चिखली व घुटेवाडी येथील डोंगरावरील वितरण हौदात सोडण्याचे नियोजन आहे. प्रकल्पासाठी एकूण ३९.७१ हेक्टर क्षेत्र आवश्यक असून त्यापैकी ३०.२२ हेक्टर खाजगी क्षेत्र संपादित करण्यात येणार आहे.

प्रस्तावित कार्यक्रमानुसार पुढील चार वर्षांत ही सगळी कामे पूर्ण होतील, असे डॉ. सुजय विखे पाटील यांनी यांनी सांगितले तसेच साकळाई उपसा सिंचन योजनेस मान्यता दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार व्यक्त केले आहे.

# भारतीय जनता पक्षातर्फे अक्षय शिवाजीराव कर्डिले यांना राहुरी मतदारसंघातून उमेदवारी

नगर – दिवंगत आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनानंतर



राहुरी मतदारसंघात भारतीय जनता पक्षाने (भाजप) २०२६ च्या विधानसभेच्या पोटनिवडणुकीसाठी अक्षय शिवाजीराव कर्डिले यांना अधिकृत उमेदवारी जाहीर केली आहे. केंद्रीय निवडणूक समितीने दिलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, राहुरी (२२३) मतदारसंघातून अक्षय कर्डिले यांची निवड करण्यात आली आहे.

## कार्यकर्त्यांची मागणी अखेर मान्य

शिवाजीराव कर्डिले यांच्या अकाली निधनानंतर त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेण्यासाठी अक्षय कर्डिले यांनाच उमेदवारी द्यावी, अशी मागणी कार्यकर्त्यांकडून होत होती. गावोगावी बैठका, संवाद यात्रा आणि जनसंपर्कातून ही मागणी अधिक तीव्र झाली होती. अखेर पक्षश्रेष्ठींनी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर करत हा निर्णय घेतला.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### खा भिजवलेले शेंगदाणे...

भिजवलेले शेंगदाणे पोषक तत्वांनी समृद्ध असतात आणि ते खाल्ल्याने शरीराला प्रथिने, ऊर्जा आणि अनेक आवश्यक पोषक तत्वे मिळतात. योग्य वेळी आणि योग्य पद्धतीने त्यांचे सेवन केल्याने अनेक आरोग्य फायदे मिळू शकतात. गरिबांचा काजू म्हणून ओळखले जाणारे शेंगदाणे हे पौष्टिकतेचे एक प्रमुख स्नॅक्सपैकी एक आहे. लोक सामान्यतः ते भाजलेले, मीठ घातलेले किंवा कच्चे खातात. भिजवलेले शेंगदाणे खाल्ल्याने पचनसंस्था सुधारते. त्यातील फायबर पोट स्वच्छ ठेवण्यास मदत करते, ज्यामुळे बद्धकोष्ठता आणि गॅस सारख्या समस्यांपासून आराम मिळतो. पचनसंस्था सुधारण्यासोबतच, भिजवलेले शेंगदाणे खाल्ल्याने वजन कमी होण्यासही मदत होते. प्रथिने आणि फायबर समृद्ध असल्याने, ते तुम्हाला बराच काळ पोट भरल्यासारखे वाटते, त्यामुळे वारंवार भूक लागणे टाळता येते. भिजवलेल्या शेंगदाणे खाणे हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे. भिजवलेल्या शेंगदाण्यांमध्ये मोनोअनसॅच्युरेटेड फॅटस् असतात, जे कोलेस्ट्रॉल नियंत्रित करण्यास आणि हृदयरोग रोखण्यास मदत करतात. त्यामध्ये हृदयाच्या आरोग्यास प्रोत्साहन देणारे अँटीऑक्सिडंट्स देखील असतात.

## पाककला

### ड्राय फ्रूट पंचामृत

**साहित्य :** दूध १ कप, दही १ कप, मध २ मोठे चमचे, शुद्ध तूप १ मोठा चमचा, साखर १ मोठा चमचा, ड्राय फ्रूट्स् काजू, बादाम, किशमिश १/४ कप बारीक कापलेले

**कृती :** एका पातेलीत दूध आणि दही घालून मिक्स करावे. आता यामध्ये मध आणि तूप घालावे. मध आणि तूप मिक्स केल्याने पंचामृतात गोडवा येतो. आता साखर घालून व्यवस्थित ढवळावे. साखर विरघळल्यानंतर त्यामध्ये ड्राय फ्रूटस् घालावे. ड्राय फ्रूटस् मुळे पंचामृताची चव तर वाढतेच पण पोषयुक्त देखील बनते.

## वास्तू

### हॉटेल प्लॉटचे स्थान

* प्लॉटच्या स्थानामुळे हॉटेलचे यश आणि अपयश दोन्ही होऊ शकते. हॉटेलच्या सर्व बाजू रस्त्याला तोंड देता येतील अशा पद्धतीने जागा निवडावी असे वास्तू म्हणते. जर ते शक्य नसेल, तर उत्तर आणि पूर्व बाजूंना तोंड द्यावे लागेल.

* हॉटेलच्या खोल्यांमध्ये बेड दक्षिण किंवा पश्चिम स्थितीत असणे आवश्यक आहे. त्यामुळे झोपताना पाहुण्यांचे पाय उत्तर किंवा पश्चिम दिशेला असतात. बाल्कनीची जागा म्हणून नेहमी उत्तर आणि पूर्वेकडील बाजू निवडण्याचे लक्षात ठेवा.

## सौंदर्य

साधारणपणे मुले साबणानेच चेहरा धुतात. पण हे अजिबात करू नका वेगवेगळ्या त्वचेचे प्रकार लक्षात घेऊन फेस वॉशमध्ये घटकांचा वापर केला जातो. जेणेकरुन त्वचेला आवश्यकतेनुसार पोषण आणि स्वच्छता मिळू शकेल. कोरड्या त्वचेसाठी एलोवेरा फेसवॉश सर्वोत्तम आहे. तर तेलकट त्वचा असणाऱ्यांनी अननसाचा फेसवॉश वापरावा. त्यामुळे तुमच्या त्वचेनुसार फेसवॉश निवड.

## सल्ला

गोड बुंदी, बर्फीचे तुकडे उरल्यास दूध व ब्रेड घालून खीर किंवा पुडिंग बनवावे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

गुरुवार, दि. २ एप्रिल २०२६

**हनुमान जयंती, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, चैत्र शुक्लपक्ष, हस्त १७।३९, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०५ वा. ३० मि.**

### राशिभविष्य

**मेष** : मनोबल व आत्मविश्वास वाढविणारी एखादी घटना घडेल. आपल्या प्रिय व्यक्तींचा सहवास लाभेल. मागील उधारी उसनवारी वसूल होईल.

**वृषभ** : व्यवसायातील आर्थिक महत्त्वाची कामे मार्गी लावू शकाल. हितशत्रुंपासून सावध रहावे.

**मिथुन** : मनोबल व आत्मविश्वास उत्तम राहील. जिद्द व चिकाटीने कार्यरत राहून कामे मार्गी लावू शकाल. वादविवादात सहभाग टाळावा.

**कर्क** : महत्त्वाचे निर्णय घेण्याचे टाळावे. तांत्रिक वस्तू व वाहने जपून वापरावीत हलगर्जीपणा केल्यास धोका संभवतो. वडिलधाऱ्यांचा आधार मिळाल्याने अडकलेली कार्य पूर्ण होईल.

**सिंह** : वैवाहिक सौख्य लाभेल. मानसिक प्रसन्नता लाभेल. बाहेरचे जेवण शक्यतो टाळावे. आरोप-प्रत्यारोपांपासून दूर रहा.

**कन्या** : आजचा दिवस फायदेशीर ठरेल. आरोग्याकडे लक्ष द्यावे. कौटुंबिक वातावरण चांगले राहिल. आजच्या दिवसाचा उपयोग नाती-संबंधात नवीन उर्जा भरण्यासाठी करा.

**तूळ** : व्यवसायात उधारी, उसनवारीची कामे यशस्वी होणार आहेत. जुने मित्र भेटतील. मागील देणी फिटतील.

**वृश्चिक** : तुमच्या राहत्या जागेचे किंवा प्रॉपर्टीच्या जागेचे प्रश्न सोडवू शकाल. भावनात्मक स्वभावाचे असल्यामुळे आपणास नुकसान होणे शक्य आहे म्हणून मनावर नियंत्रण ठेवा.


**धनु** : हाती घेतलेल्या कामात यश मिळवाल. जिद्द व चिकाटी वाढेल. वेळ आनंदपूर्वक व्यतीत होईल. महत्वपूर्ण कार्ये योग्य वेळी होतील.

**मकर** : प्रॉपर्टीची कामे मार्गी लागतील. व्यवसायातील आर्थिक गुंतवणूक फायदेशीर. मागील राहिलेले सरकारी काम पूर्ण होण्याचे योग आहेत.

**कुंभ** : रखडलेली कामे मार्गी लावू शकाल. आर्थिक लाभाचे प्रमाण समाधानकारक राहील.

**मीन** : शैक्षणिक व बौद्धिक क्षेत्रातील व्यक्तींना दिवस चांगला जाईल. वरिष्ठांकडून कौतुकाचा वर्षाव होईल. सहकाऱ्यांशी शक्यतो वाद होऊ देऊ नयेत.

## शब्दगंध क्र. ७४०० सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७३९९ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) गायनातील एक राग ७) पश्चिम दिशा ८) सोजी; मैद ११) होडी वगैरे उतरून जाण्याजोगी लहान खाडी; त्याअर्थी १२) आश्चर्य; आश्चर्यकारकरीतीने १४) एक लोकप्रिय पेय १५) शेती करणारा १७) गव्हाचे पीठ १९) पूर्ण भरतीची वेळ २१) मातीचे भांडे; गाडगे २३) चहा पिण्याच्या भांड्यांची जोडी २४) बांगड्या विकणारा किंवा भरणारा; जलाशय; तळे

**उभे शब्द :-** १) युग; हंगाम २) एक धान्य; जव; सातू ३) महाराष्ट्रातील एक जिल्हा ४) साधू, संन्याशी ५) एक सम संख्या; एका महिन्यातील सरासरी दिवस ६) वहाण; पायताण ९) पिवळा १०) सर्व अंग टेकून; हातपाय पसरून १२) अंघोळ करण्याची जागा; स्नानगृह १३) पद्धत; चाल; तऱ्हा १४) बोलाचाल; भांडण १६) फटीतून येणारा प्रकाशकिरण १८) हातोटी; कौशल्य २०) एक क्षुद्र कीटक; मक्षिका २१) एक धान्य ज्याचे कणीस भाजून खातात २२) कचरा; गदळ

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : पराभवाने कथा संपत नाही, तर नव्या अध्यायाची सुरुवात होते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### न्यूझीलंड क्रिकेट संघाला 'किवी' संघ का म्हणतात माहितेय का?

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये काही संघांना त्यांच्या टोपण नावाने ओळखले जाते. त्यापैकीच एक संघ म्हणजे न्यूझीलंड संघ. तुम्ही अनेकदा पाहिलं असेल की, न्यूझीलंड संघ ज्यावेळी मैदानावर खेळत असतो त्यावेळी समालोचक किवी खेळाडू आणि किवी संघ असे म्हणत असतात. तसेच ऑस्ट्रेलिया संघाला ऑसी किंवा कांगारू असे म्हणतात. तुम्हाला ही अनेकदा असा प्रश्न पडला असेल की, न्यूझीलंड संघाला किवी असे का म्हणतात? चला तर जाणून घेऊया.

न्यूझीलंड संघाला किवी संघ म्हणण्यामागे एक रंजक गोष्ट आहे. जी खूप कमी लोकांना माहीत आहे. सुमारे ११०० वर्षांपूर्वी न्यूझीलंड व्यंगचित्रकारांनी एक देश म्हणून न्यूझीलंडचे प्रतिनिधित्व करण्यासाठी किवी पक्ष्यांची चित्रे वापरण्यास सुरुवात केली होती. पहिल्या महायुद्धात न्यूझीलंडच्या सैनिकांना 'किवी' असे संबोधले जात होते आणि नंतर हीच त्यांची ओळख देखील बनली. न्यूझीलंडच्या नागरिकांनी आणि सैनिकांनी देखील किवी शब्दाचा स्वीकार केला. हेच कारण आहे की, न्यूझीलंड संघाला किवी असे म्हटले जाते. केवळ क्रिकेटच नव्हे तर न्यूझीलंडच्या इतर संघांना देखील किवी संघ असे म्हटले जाते.

किवी हा न्यूझीलंडचा राष्ट्रीय पक्षी देखील आहे. हा असा पक्षी आहे जो गगन भरारी घेत नाही. किवी पक्ष्यामुळेच न्यूझीलंडला किवीलँड असे देखील म्हटले जाते. आता आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये देखील न्यूझीलंड संघाची ओळख किवी संघ अशी आहे.

तसेच आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये दबदबा असलेल्या ऑस्ट्रेलिया संघाला कांगारू असे म्हणतात. कांगारू हा ऑस्ट्रेलियाचा राष्ट्रीय प्राणी आहे. तसेच ऑस्ट्रेलिया संघातील खेळाडूंना देखील कांगारू असे म्हणतात. आता समालोचक समालोचन करत असताना देखील किवी आणि कांगारू या शब्दांचा वापर करत असतात.

### 'गरजू राजा'

एकदा एक ऋषी एका प्रसिद्ध राजाच्या राजधानीतून जात होता. चालत असताना त्याला रस्त्यावर पडलेले एक नाणे दिसले. त्याने ते उचलले. तो त्याच्या साध्या जीवनावर समाधानी होता आणि त्याला त्याची गरज नव्हती. म्हणून त्याने ते गरजू व्यक्तीला दान करण्याचा निर्णय घेतला. तो दिवसभर रस्त्यावर भटकत राहिला, पण त्याला कोणीही गरजू आढळले नाही. शेवटी, तो एका विश्रांतीच्या ठिकाणी पोहोचला आणि तिथे रात्र घालवली.

दुसऱ्या दिवशी सकाळी, तो त्याच्या दैनंदिन कामासाठी उठला आणि त्याला एक राजा त्याच्या युद्धासाठी सज्ज सैन्यासह दुसऱ्या राज्यावर हल्ला करणार होता असे दिसला. जेव्हा राजाने ऋषीला तिथे उभे असलेले पाहिले तेव्हा त्याने त्याच्या सैन्याला थांबण्याचा आदेश दिला. तो ऋषीकडे आला आणि म्हणाला, हे महान ऋषी, मी दुसरे राज्य जिंकण्यासाठी युद्धाला जात आहे जेणेकरून माझे राज्य वाढेल. म्हणून मला विजयाचा आशीर्वाद द्या.

काळजीपूर्वक विचार केल्यानंतर, ऋषीने राजाला एक नाणे दिले! राजाला हे ऐकून आश्चर्य वाटले आणि तो रागावला. तो आधीच सर्वात श्रीमंत राजांपैकी एक होता, मग त्याला एकाच नाण्याची गरज का पडेल? त्याने उत्सुकतेने ऋषीला विचारले, या एकाच नाण्याचा अर्थ काय आहे? एका ऋषीने स्पष्ट केले, हे राजा!

काल, तुमच्या राजधानीच्या रस्त्यांवर फिरताना मला हे नाणे सापडले. मला त्याची गरज नव्हती. म्हणून मी ते गरजू व्यक्तीला दान करण्याचा निर्णय घेतला.

मी संध्याकाळपर्यंत तुमची राजधानी फिरलो, पण मला कोणीही गरजू आढळले नाही. सर्वजण आनंदाने जगत होते. असे वाटत होते की त्यांच्याकडे जे आहे त्यात ते समाधानी आहे. म्हणून, मला हे नाणे देऊ शकेल असा कोणीही सापडला नाही. पण आज, या राज्याचा राजा अजूनही जास्त इच्छितो आणि त्याच्याकडे जे आहे त्यावर तो समाधानी नाही, म्हणून मला वाटले की तुम्हाला हे नाणे आवश्यक आहे.

आता मात्र ऋषींचे बोलणे ऐकून राजाचे डोळे उघडले आणि राजाला त्याची चूक कळली आणि त्याने नियोजित युद्ध रद्द केले.

तात्पर्य : आपण सर्वांनी आपल्याकडे जे आहे त्यात समाधानी राहण्यास शिकले पाहिजे.



## जीवन का अमृत (भाग १)

२. सभी धर्म इस बात पर सहमत हैं कि आत्मा के ठिकाने (दिव्य चक्षु) पर की गई प्रार्थना अंतर में छुपी प्रभु की सभी शक्तियों को प्रकट कर देती है और इसके द्वारा साधक आध्यात्मिक सुंदरता पा सकता है। यह कर्ता और उसकी सृष्टि या प्रभु और इंसान को आपस में जोड़ने वाली कड़ी है। यह आध्यात्मिक जिज्ञासु के हाथों में एक मददगार हथियार है। एक पवित्र यात्रा कर रही आत्मा, यात्रा के आरम्भ से अंत तक, इसके बिना नहीं रह सकती, क्योंकि यह साधक को रास्ते के कई धोखों से बचाती है और मन को पूरी तरह बदल डालती है, जब तक कि यह जगमगाने नहीं लगता और आत्मा की ज्योति को परावर्तित करना शुरू नहीं कर देता ।

### परिस्थिती के अनुसार बदले

परिस्थितियों के अनुसार अच्छे से अच्छा ढालने की कोशिश करें।

९. तो सच्ची प्रार्थना, भटकती हुई बुद्धि को एक स्थान पर इकट्ठा करने का तरीका है- आत्मा के निवास स्थान पर, यानि सुरत की धारा को दो आँखों के बीच और थोड़ा पीछे, एक ही स्थान पर एकत्रित करना ।

यहीं पर हैं सारी पूजा, प्रार्थनाएँ, सारे सन्यास और इस लोक तथा परलोक का सारा ज्ञान । मुक्ति का रास्ता आंतरिक शक्ति से सीधा संपर्क करने में है, न कि बाहरी कर्मकांडों में उलझने में ।

१०. एक स्नेही शिष्य, अपनी गलतियों और कमियों के लिए, जो कि जाने-अनजाने में दिन में हो जाया करती हैं, सदा प्रार्थना और पछतावा करता है । प्रार्थना बाहरी दिखावे के लिए नहीं है, बल्कि यह आत्मा की दुख भरी पुकार है, जिससे दिव्य दया जागृत होती है और जब यह सही प्रकार से की जाए, तो आश्चर्यजनक नतीजे देती है और प्यारा नामलेवा, सत्गुरु की दया से, विस्मयकारी प्रेरणा और कृतज्ञता से भर जाता है (क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### एक सुंदर नाते

सुरेश ओबेरॉय : मी हे करू शकेन की नाही असं मला वाटायचं हेच कारण आहे. शिवानीदीदी : पण तुम्ही कधीच तुमच्या कष्टांचं फळ अनुभवलं नाहीये?

सुरेश ओबेरॉय हो, मी अनुभवलंय. पण जेव्हा मी इतरांशी माझी तुलना करतो आणि मी खूपच हळू प्रगती करतोय असं मला जाणवतं तेव्हा मला वाईट वाटतं.

शिवानीदीदी : प्रामाणिक तुलना फक्त स्वत:शीच करता येते. कितीही छोटी प्रगती असली तरी नेहमीच स्वतःचं कौतुक करावं आणि स्वतःच स्वतःला प्रेरणा द्यावी. प्रवासात बाकीचे आपल्या मागे असले किंवा पुढे गेले तरीही इतरांकडे बघू नये. 'माझ्या क्षमतेप्रमाणे मी काल कुठे होतो, आज कुठे आहे आणि मी उद्या कुठे पोहोचू शकतो हे नेहमी तपासायला हवं. काल दिवसभरात जर मला दहा वेळा राग आला असेल तर आज तो आठ वेळा आला का?'

सुरेश ओबेरॉय : पण आपल्या आजूबाजूचे लोक आपल्यातील सुधारणा पाहत नाहीत. त्यांचं लक्ष तर आपल्यातील कमतरतांवर असतं.

शिवानीदीदी : नकारात्मक बाजूकडे बघणं हा त्यांच्यावरचा संस्कार आहे पण तुम्ही तुमची प्रगती करत आहात. त्यामुळे तुमच्यावर याचा परिणाम होण्याची गरज नाही. तुम्ही फक्त स्वत:कडे बघायला हवं. कारण कोणालाच तुमच्याबद्दल आणि तुम्ही स्वत:त जो बदल करताय त्याविषयी पूर्ण माहिती नाही. अशा प्रकारे तुम्हीच तुमचं मोजमाप करायला हवं.

सुरेश ओबेरॉय : म्हणजे आपणच आपले शिक्षक आणि परीक्षक आहोत. आणि आपल्यालाच सुधारणा करायची आहे. तसंच आपल्याला आपली पाठही थोपटायची आहे.

शिवानीदीदी : हो, रोजच्या रोज स्वतः स्वतःचं कौतुक करणं खूप महत्त्वाचं आहे. आपली नाती मुळात जितकी सुंदर आणि सुसंगत होती तशीच ती पुन्हा बनवायची असतील तर त्यासाठी पहिली पायरी म्हणजे स्वत:बरोबर एक सुंदर नातं तयार करणं.

सुरेश ओबेरॉय : जर मी एखादी चूक केली आणि त्यासाठी स्वतःवर टीका केली, तर याचा अर्थ माझं स्वत:बरोबर असलेलं नातं चांगलं नाही असा होतो का? शिवानीदीदी : टीका ही नकारात्मक ऊर्जा आहे त्यामुळे ती टाळणंच योग्य. समजा, एखादी व्यक्ती उभं राहण्यासाठी खूप कष्ट घेते पण तरी ती खाली पडताना किंवा हरताना दिसते. अशा वेळी तुमची प्रतिक्रिया काय असेल? तुम्ही तिचं कौतुक कराल. पण जर टीका केली तर तुम्ही तीच शक्ती शोषून घ्याल जिच्या आधारे ती व्यक्ती उभं राहण्याचा प्रयत्न करत होती.

असंच आपल्या बाबतीतही आहे. आपण स्वतःत प्रगती करायचा प्रयत्न करत असताना जर त्यासाठी वेळ लागत असेल तर आपल्या प्रयत्नांना चालना देण्यासाठी आपण स्वतःला सकारात्मक ऊर्जा देण्याची गरज आहे. आपण आपलेच टीकाकार

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बायको : 'अहो, ऐकलंत का? आपल्या लग्नाचा अल्बम बघताना मुलं विचारत होती की, तुम्ही दोघं लग्नाचे कपडे घालून काय करत होतात?'
नवरा : 'तू सांगायचं होतंस ना की, 'बलिदान' देत होतो!'

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* रेल्वेचा स्वतंत्र अर्थसंकल्प कधीपासून केंद्रीय अर्थसंकल्पात विलीन करण्यात आला? - २०१९ पासून

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

### पेरू

९) बालके, गर्भवती स्त्रिया, अशक्त स्त्रिया, कृश व्यक्ती यांनी पेरूचे नियमित सेवन करावे. यामध्ये असणाऱ्या क जीवनसत्त्वामुळे व इतर पौष्टिक घटकांमुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढून शरीर सुदृढ व मजबूत होते.

१०) शरीराच्या एखाद्या भागावर सूज येऊन तो भाग ठणकत असेल, तर पेरूच्या पानांचे पोटीस करून बांधावे. यामुळे तेथील सूज कमी होऊन ठणका कमी होतो.

११) गर्भवती स्त्रीला जर उलटी, मळमळ असा त्रास होत असेल, तर पेरूचे सरबत थोड्या थोड्या अंतराने पीत राहावे. यामुळे तोंडास रुची निर्माण होऊन उलटी, मळमळीची भावना कमी होऊन भूक चांगली लागते.

सावधानता :

पेरू खाताना तो स्वच्छ धुऊन कीड लागलेली नाही हे पाहून खावा. खूप पिकलेल्या पेरूला कीड असण्याची शक्यता असते, म्हणून मध्यम पिकलेला पेरू खावा. तसेच सर्दी-खोकला, घसा दुखणे हे आजार झालेले असताना पेरू खाऊ नये. एकदम सकाळी किंवा रात्रीच्या वेळी पेरू खाऊ नये. तसेच फ्रीजमध्ये ठेवलेला पेरू खाऊ नये. खूप कच्चा पेरू खाल्ल्यास त्यामध्ये असणाऱ्या बियांमुळे पोटदुखी होऊ शकते, म्हणून सहसा मध्यम पिकलेला पेरू दुपारच्या जेवणासोबत किंवा जेवण झाल्यावर खावा.)

---

सृष्टीमध्ये निर्माण होणाऱ्या सर्व फळांमध्ये फणस हे फळ आकाराने सर्वात मोठे असते. भारत आणि दक्षिण आशिया हे फणसाचे मूळस्थान आहे. त्यातही बंगळुरु, गोवा, कोकण या दक्षिण भारतात फणसाची झाडे जास्त आढळतात. सहसा डोंगराळ भागात ही झाडे जास्त असतात. संस्कृतमध्ये 'बीजपूर अज्ञीर', मराठीत 'फणस', इंग्रजीत 'जॅकफ्रुट', तर शास्त्रीय भाषेत 'अर्टोकारपस हेट्रेरोफायलस' या नावाने प्रसिद्ध असलेल्या फणसात अनेक औषधी गुणधर्म आहेत. फणस हे मोरॅसी या कुळातील असून, बरका व कापा फणस अशा त्याच्या दोन जाती आहेत. कापा प्रकारात मधुर, चविष्ट व कडक असे गरे आढळतात व हे गरे पिवळ्या रंगाचे असतात; तर बरकामध्ये गोड व लिबलिबीत, नरम व पांढरे गरे आढळतात. फणसावर जाड काटे असतात.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांड्ळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००




श्रीरामनवमीच्या पावन निमित्ताने श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज उपासना संस्थानच्या थोरले श्रीराम मंदिराच्या प्रांगणात 'आज अयोध्या सजली' या श्रीराम कथेवर आधारित नृत्य-नाटिकेचा अद्भूत आणि नयनरम्य कलाविष्कार सादर करण्यात आला. (छाया - लहू दळवी)

# श्रीरामनवमीला थोरले श्रीराम मंदिरात 'आज अयोध्या सजली' नृत्यनाटिका

### श्री गुरुमाऊली संगीत विद्यालयाचा कलाविष्कार; नृत्य-नाट्याच्या माध्यमातून श्रीराम कथा सजीव

नगर - श्रीरामनवमीच्या पावन निमित्ताने नेप्ती येथील कल्याण रोडवरील श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज उपासना संस्थानच्या थोरले श्रीराम मंदिराच्या प्रांगणात आज अयोध्या सजली या श्रीराम कथेवर आधारित नृत्य-नाटिकेचा अद्भुत आणि नयनरम्य कलाविष्कार सादर करण्यात आला. श्री गुरुमाऊली संगीत विद्यालयाच्या वतीने सायंकाळी ६ वाजता हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. सी.बी. कुलकर्णी, डॉ. सौ. गौरी कुलकर्णी, अशोक जरीवाला, विलास बडवे व सौ. वर्षा पंडित यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व गोंदवलेकर महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

सुरुवातीला श्री रामचंद्र कृपालु भजमन या भक्तिगीतावर सादर झालेल्या नृत्याने वातावरण भक्तिमय झाले. त्यानंतर हम कथा सुनाये राम सकल गुणधाम की या गाण्यावर श्रीराम कथेची सुरेख मांडणी करत नृत्य-नाटिकेची सुरुवात झाली. नृत्य आणि नाट्य यांच्या प्रभावी संगमातून श्रीरामाची कथा हळूहळू उलगडत गेली आणि प्रत्येक प्रसंग लयबद्ध सादरीकरणातून जिवंत झाला.

कार्यक्रमादरम्यान प्रेक्षक अक्षरशः मंत्रमुग्ध झाले होते. प्रभू श्रीरामचंद्र की जय अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. श्रीराम अयोध्येत परतल्याचा प्रसंग आणि 'त्रिवार जयजयकार' या गाण्याने कार्यक्रमाची सांगता झाली. यामुळे उपस्थितांना जणू प्रत्यक्ष अयोध्येतील उत्सव अनुभवण्याचा आनंद मिळाला.

श्री गुरुमाऊली संगीत विद्यालय निर्मित आज अयोध्या सजली ही नृत्यनाटिका यापूर्वी गोव्यातही अनेक मान्यवरांसमोर सादर झाली असून हा तिचा पाचवा प्रयोग होता. नवीन विद्यार्थी कलाकारांच्या सहभागातूनही हा प्रयोग यशस्वीपणे पार पडला.

विद्यालयाच्या संचालिका नृत्य तपस्वी सौ. वर्षा चंद्रकांत पंडित यांनी या कार्यक्रमाचे नृत्य व नाट्य दिग्दर्शन केले. विशेष म्हणजे त्यांनीच माता कौसल्या, गुरू विश्वामित्र व रावण या तीन महत्त्वाच्या भूमिका प्रभावीपणे साकारत उपस्थितांना अचंबित केले.

राममंदिरात समर्पित केलेली ही सेवा खऱ्या अर्थाने रुजू झाली, असे त्यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाचे निवेदन सौ. भक्ती मंगेश पुराणिक यांनी केले. की-बोर्डवर अंबरीश जहागिरदार आणि तबल्यावर आनंद ऋषी यांनी उत्कृष्ट साथसंगत केली. गायन शाखेतील लहान विद्यार्थी श्रीयांश घोडके याने नृत्यासाठी बोलाची पढंत करून सर्वांची वाहवा मिळवली.

या कार्यक्रमात विद्यालयाच्या भरतनाट्यम शाखेतील तब्बल ४२ विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. आस्था पिंगळीकर, रिया सरोवरे, दर्शना दंडवते, पूर्वा म्याना, ललिता सकट, कार्तिकी गुंजाळ, आरोही साबळे, मानवी डेरे, नीलाक्षी वामने, ज्ञानेश्वरी झगडे, देविका साळुंखे, दिव्या राणे, ईश्वरी भापकर, वेरोनिका जाधव, तनया येनगुल, सृष्टी गंधे, रेवती घोटणकर, स्नेहा विखे, मुग्धा भालेराव, कावेरी एकलहरे, श्रेया जाधव, दूर्वा गायकवाड, शुभ्रा मस्तोळी, स्वराली बोरुडे, माही मिसाळ, मीरा जऱ्हाड, शौर्या कांबळे, जानवी बोरुले, अन्वी भोईटे, सर्वांगी आंबेकर, वेदिका साठे, रिजूल शिंदे, शांभवी क्षीरसागर, प्रार्थना सुपलकर, जुईली शिंदे, त्रिशा लहारे, मनस्वी कदम, सुमुखी लोखंडे, कादंबरी साळुंके आदी विद्यार्थिनींचा समावेश होता.

कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. सी.बी. कुलकर्णी यांनी या नृत्यसेवेचा गोड शेवट झाला असून श्रीरामराय पंडित दाम्पत्याला नक्कीच याचे फळ देतील, असे आशिर्वाद दिले.

विद्यालयाचे सहसंचालक चंद्रकांत पंडित यांनी विद्यार्थ्यांच्या पालकांच्या सहकार्यामुळे हे शिवधनुष्य पुन्हा उचलता आले. आमची ही संगीत सेवा रामाच्या चरणी रुजू झाली, अशा शब्दांत भावना व्यक्त केल्या.

## प्रेरणादायी अक्षरधन

### संत सोनोपंत

"मुसाफिर" वाचनीय मननीय संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी चैतन्य पालवी डॉ. रामचंद्र देखणे 'चपराक' प्रकाशित ललित चिंतन

साधुत्व आणि पांडित्य यांचा सुरेख संगम गुरुवर्य मामासाहेब दांडेकर यांच्या व्यक्तिमत्त्वात झाला होता. तत्त्वज्ञ, प्राचार्य, विचारवंत, लोकशिक्षक याबरोबरच अलीकडच्या काळातील महान संत म्हणूनच मराठी माणूस आणि मराठी मन मामासाहेबांच्या ठायी विनम्र झाले आहे. महाराष्ट्र ही संताची भूमी. ज्ञानदेवांपासून तुकोबारायांपर्यंत आणि त्यानंतर निळोबारायांपर्यंत आलेल्या संतपरंपरेचे लोकोद्धाराचे महान कार्य मामासाहेबांनी पुढे चालू ठेवले.

ज्ञानाला निरहंकाराची, कर्माला शुद्धतेची विचारांना आचारांची, व्यवहाराला नीतीची, शब्दांना प्रासादिकतेची, शिक्षणाला जीवनमूल्यांची जोड देऊन उभे असलेले मामांचे व्यक्तिमत्त्व हाच सात्विकतेचा महान आदर्श झाला आहे. मामा हे तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक होते. अध्यापन चालू होते त्याचवेळी सतत संचार करून कीर्तना-प्रवचनाचेही कार्य चालू होते. चैत्र महिन्यापासून ते थेट फाल्गुनापर्यंत त्यांची नैमित्तिक कीर्तन-प्रवचने ठरली होती. हजारो लोक बैलगाड्या घेऊन मामांच्या कीर्तनाला येत असत. त्यांचे कीर्तन ऐकणे हाच अमृतानंदाचा अनुभव असे.

साच आणि मवाळ ।<br>
मितुले आणि रसाळ ।<br>
शब्द जैसे कल्लोळ । अमृताचे ।

अमृताचे शब्द कल्लोळ साच मवाळ आणि रसाळ वाणीतून उमटत असत. श्रवणसुखाने श्रोतृवर्ग समाधानी होई. श्रोत्यांना मामांच्या कीर्तनाची गोडी कि होती याविषयी एक घडलेला प्रसंग त्यांच्या चरित्रात लिहिला आहे. नगरपासून जवळच डोळेवाडी नावाचे एक छोटे गाव आहे. त्या गावात सावतोबांचे मंदिर आहे. तेथे भजन-कीर्तनाचे कार्य नित्य चालू असे. त्याच परिसरात मामासाहेबांच्या कीर्तनश्रवणाने भारावलेले बापू पवार नावाचे सद्‌गृहस्थ नेहमी कीर्तनाला येत असत. एकदा त्या भागात मामांचे कीर्तन ठरले होते. दुर्दैवाने कीर्तनाच्या सुमारासच बापूंची पत्नी वारली. बापूंवर मोठा कठीण प्रसंग ओढवला. एकीकडे तर कीर्तनश्रवणाची ओढ लागलेली. शेवटी आपल्या पत्नीचे प्रेत झाकून बापू कीर्तनाला गेले. कोणासही न सांगता निर्विकारपणे त्यांनी सर्व कीर्तन ऐकले. कीर्तन संपल्यानंतर प्रेताचे सर्व क्रियाकर्म उरकले. पेरणीसाठी वाफसा आला आहे. याच वेळी नेमकी घरात मयत झाली तर...

'मढे झाकूनिया करिती पेरणी' या तुकोबारायांच्या अभंग वर्णनाप्रमाणे शेतकरी मढे झाकून पेरणी करून घेतो आणि नंतर प्रेताची विल्हेवाट लावतो. तसेच काहीसे याही वेळी घडले. मामांच्या कीर्तनश्रवणासाठी पत्नीचे प्रेतही झाकून ठेवून दुःख गिळून आलेल्या या महान श्रोत्याची भूमिका पाहिल्यावर मामांचे कीर्तन कसे असेल याची आपोआप कल्पना येते.

बोलू ऐसे बोले ।<br>
तेणे बोले विठ्ठल डोले।

परमात्म्याला डोलायला लावण्याचे सामर्थ्य मामांच्या कीर्तनात होते. व्यसनमुक्ती, कर्मयोग, देशभक्ती, अनासक्त वृत्ती यासारखे विचार सांगून, जीवनमूल्ये मांडून मामांनी खरोखरीच ज्ञानदीप चेतविला आहे.

**- किशोर गांधी**

# महावीर स्वामींच्या विचाराने नगरच्या महावीर इंटरनॅशनलचे उत्कृष्ट समाजाभिमुख कार्य

### आ.संग्राम जगताप यांचे प्रतिपादन

नगर - भगवान महावीर स्वामींच्या विचाराने प्रेरित होऊन महावीर इंटरनॅशनल नगरमध्ये समाजाभिमुख कामे व मदत कार्य करत आहे. भगवान महावीर स्वामींचा मानवसेवा हीच खरी सेवा हा विचार प्रत्यक्षात आणून मानवातच ईश्वराला पाहिले जात आहे. या कार्यांचा सर्वांनी आदर्श घ्यावा. अहिल्यानगरच्या केंद्राचे काम राज्यात एक नंबर होण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करून नगरचे नावलौकिक उंचवावे. भगवान महावीर स्वामींच्या विचाराने प्रेरित होऊन मी पण समाजासाठीच जास्तीत जास्त काम करत आहे. भविष्यात शहराच्या वैभवात भर घालण्यासाठी महावीर इंटरनॅशनलने चौक सुशोभीकरणासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन आ.संग्राम जगताप यांनी केले.

आ.संग्राम जगताप यांच्या स्थानिक विकास निधीतून महावीर इंटरनॅशनल अहिल्यानगर केंद्राच्या नूतन सभामंडपाचे लोकार्पण आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. यावेळी उद्योगपती संपतलाल बाफना, महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, माजी उपमहापौर गणेश भोसले, नगरसेवक प्रकाश भागानगरे, नगरसेविका मीना चोपडा, अनिता शेटिया व सुनिता फुलसौंदर, महावीर इंटरनॅशनलचे सभागीय अध्यक्ष विकास पाटणी, संतोष बोथरा, गव्हर्निंग कौन्सिल सदस्य धनराज संचेती व मनोज शेटीया, संजय चोपडा आदींसह पदाधिकारी व विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते.



महावीर इंटरनॅशनल नूतन सभामंडपाचे लोकार्पण आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमात महावीर इंटरनॅशनलचे नूतन अध्यक्ष राजेंद्र बोथरा, सेक्रेटरी वसंत बोरा, खजिनदार गौतम पारख तसेच महिला आघाडीच्या नूतन अध्यक्षा वर्षा बाफना, सेक्रेटरी अपर्णा बोथरा व खजिनदार उल्का पारख, सतीश चोपड़ा, सरला बरमेचा, नीलेश बोथरा, अक्षय बाफना आदींना महावीर इंटरनॅशनलचे सभागीय अध्यक्ष विकास पाटणी यांनी पदभार दिला.

नूतन अध्यक्ष राजेंद्र बोथरा म्हणाले, महावीर इंटरनॅशनलच्या अहिल्यानगर केंद्राच्या अध्यक्ष पदाची मोठी जबाबदारी माझ्यावर टाकली आहे. सर्वांच्या सहकार्याने ही जबाबदारी निष्ठेने निभवणार आहे. माझ्या कार्यकाळात जास्तीतजास्त शैक्षणिक, सेवा व मदतीचे उपक्रमांना प्राधान्य देणार आहे.

प्रास्ताविकात गव्हर्निंग कॉन्सिल सदस्य मनोज शेटीया यांनी महावीर इंटरनॅशनलच्या अहिल्यानगर केंद्राच्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती देऊन आ.संग्राम जगताप यांनी संस्थेला सभामंडपासाठी निधी दिल्याबद्दल आभार मानले. तसेच माजी आमदार अरुणकाका जगताप व अहिल्यानगर केंद्राचे संस्थापक स्व.रमेश बाफना यांचे स्मरण केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेरू कर्नावट यांनी केले. वसंत बोरा यांनी आभार मानले. महिला आघाडीच्या अध्यक्षा वर्षा बाफना यांनी मनोगतातून आगामी उपक्रमांची माहिती दिली. या कार्यक्रमास महावीर इंटरनॅशनल नगर केंद्राच्या निर्मला बाफना, नरेंद्र बाफना, दिलीप कर्नावट, डॉ. प्रकाश कांकरिया, माणिकचंद कटारिया, वैशाली शेटीया, अरुण पारख, अरुणा सुराणा, अपर्णा बोरा, सुनिता कर्णावट, सरला बरमेचा, सतीश बोथरा, सतीश चोपडा, दिनेश शिंगवी, राजेंद्र बलदोटा, निर्मला बाफना, निलेश बोथरा, सुमित लोढा, सुरेखा पारख, उज्वला बोथरा, सज्जनबाई कटारिया, मनीषा शिंगवी आदींसह सदस्य व विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते.



गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर ग्राहकांसाठी महावीरा टीव्हीएस शोरूम चा लकी ड्रॉ सोहळा महावीर जयंतीच्या दिनी उत्साहात पार पडला. या सोहळ्यात आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते लकी ड्रॉ काढण्यात आला.

# 'महावीरा टीव्हीएस'च्या एका गाडीवर एक गाडी फ्री लकी ड्रॉ ऑफरमध्ये पुनम बोथरा ठरल्या विजेत्या

नगर - गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर ग्राहकांसाठी महावीरा टीव्हीएस शोरूम चा लकी ड्रॉ सोहळा महावीर जयंतीच्या दिनी उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात विविध विजेत्यांची घोषणा करण्यात आली. या सोहळ्यात आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते लकी ड्रॉ काढण्यात आला. या लकी ड्रॉमध्ये पुनम शैलेश बोथरा या भाग्यवान विजेत्या ठरल्या असून त्यांना टीव्हीएस जेस्ट ही दुचाकी गाडी मिळाली.

यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले की, मी अनेक लकी ड्रॉ पाहिले आहेत आणि विजेत्यांची घोषणा केली आहे, मात्र 'एक गाडी खरेदी करा आणि एक गाडी मोफत मिळवा' अशी संकल्पना मी पहिल्यांदाच पाहत आहे. हा उपक्रम ग्राहकांसाठी अत्यंत फायदेशीर असून महावीरा टीव्हीएस शोरूमचे खरोखर कौतुक करावे लागेल.

महावीरा टीव्हीएसच्या संचालिका सीए समृद्धी कंकरिया कटारिया यांनी सांगितले की, ग्राहकांचा विश्वास आणि मिळालेला उत्तम प्रतिसाद यामुळेच हा उपक्रम यशस्वी ठरला आहे. भविष्यातही ग्राहकांसाठी अशाच आकर्षक योजना राबविण्यात येतील.

विजेत्या पुनम बोथरा यांनी आनंद व्यक्त करत सांगितले, ही माझ्यासाठी अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. महावीरा टीव्हीएसचे मनःपूर्वक आभार.

कार्यक्रमाला नगरसेवक विकी जगताप, सागर सप्रे, बंडू नाना सप्रे, सीए समृद्धी कांकरिया कटारिया, अनमोल कटारिया, सुरेश कंकरिया, सीए प्रविण कटारिया, सत्यम कंकरिया, डॉ. विजय भंडारी, आयुष कटारिया, स्वाती कटारिया, साधना कांकरिया, सीए विधीका कटारिया, सीए स्नेहा कांकरिया उपस्थित होते. सूत्रसंचालन मंजुश्री ठोंबे यांनी केले.

एमआयडीसी परिसरातील सिद्धी लॉन शेजारी, नगर-मनमाड रोडवर असलेल्या महावीरा टीव्हीएस शोरूमने ४ ते १९ मार्च या कालावधीत विशेष ऑफर राबवली होती. या योजनेअंतर्गत वाहन खरेदी करणाऱ्या ग्राहकांना आकर्षक भेटवस्तूंसोबत लकी ड्रॉमध्ये सहभागी होण्याची संधी देण्यात आली होती.

# रामनवमीनिमित्त गुरु धाम व शक्तिधाम येथे कुमारी पूजनासह धार्मिक कार्यक्रम उत्साहात

नगर - चैत्र नवरात्राच्या पावन पर्वात अष्टमीच्या दिवशी रामनवमीचे आगमन झाल्याने येथील गुरु धाम व शक्तिधाम येथे विविध धार्मिक उपक्रम उत्साहात पार पडले. विशेषतः कुमारी पूजनाला यावेळी केंद्रस्थानी ठेवण्यात आले असून, भाविकांच्या उपस्थितीत हा सोहळा भक्तिमय वातावरणात साजरा झाला.

कार्यक्रमाच्या प्रमुख आकर्षणांपैकी कुमारी पूजन हा सोहळा ठरला. समाजातील लहान मुलींना देवीस्वरूप मानून त्यांचे पूजन करण्यात आले. यामध्ये अनेक कुमारींचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. पारंपरिक पद्धतीने त्यांच्या पाय धुऊन, ओवाळून आणि सन्मानपूर्वक त्यांना प्रसाद देण्यात आला. या उपक्रमामुळे उपस्थितांमध्ये भक्तिभाव आणि सामाजिक समतेचा संदेश अधोरेखित झाला. रामनवमीच्या निमित्ताने भगवान श्रीरामांच्या पूजनासोबतच संपूर्ण परिसरात धार्मिक वातावरण निर्माण झाले होते. भजन, कीर्तन आणि विविध धार्मिक विधींनी कार्यक्रमाची रंगत वाढवली. भाविकांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग घेतला आणि प्रसादाचा लाभ घेतला.

याच पार्श्वभूमीवर श्री पुरुषोत्तम मासानिमित्त विशेष शिवलिंग पूजन उपक्रमाची घोषणा करण्यात आली. या अंतर्गत २५ दिवसांत ५१०० शिवलिंगांचे निर्माण व पूजन केले जाणार असून, २५ यजमानांच्या सहभागातून हा उपक्रम पार पडणार आहे. विशेष म्हणजे, पूजनासाठी लागणारी सर्व सामग्री मोफत उपलब्ध करून दिली जाणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

हा उपक्रम आदीगुरु शक्तीपीठ, रासनेनगर, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात येणार असून, इच्छुक भाविकांनी ९७६५९८४२२४ व ८८५५००४३५४ या क्रमांकावर संपर्क साधावा.



रामनवमीनिमित्त गुरु धाम व शक्तिधाम येथे कुमारी पूजनासह धार्मिक कार्यक्रम उत्साहात झाला.



हनुमान जयंतीच्या पावन दिनानिमित्त अष्टविनायक ब्लड बँक व हनुमान मंदिर लक्ष्मी कारंजा मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिराला नागरिकांचा प्रतिसाद मिळाला.

# हनुमान जयंतीनिमित्त आयोजित शिबिरात ६५ जणांनी केले रक्तदान

नगर - हनुमान जयंतीच्या पावन दिनानिमित्त अष्टविनायक ब्लड बँक व हनुमान मंदिर लक्ष्मी कारंजा मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिराला नागरिकांचा प्रतिसाद मिळाला. या शिबिरात एकूण ६५ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. धार्मिक उत्सवाला सामाजिक सेवेची जोड देणारा हा उपक्रम ठरला.

शिबिराचे आयोजन शिस्तबद्ध व नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. अष्टविनायक ब्लड बँकेच्या तज्ज्ञ पथकाने रक्तदात्यांची वैद्यकीय तपासणी करून सुरक्षितरीत्या रक्तसंकलन केले.

या उपक्रमात अष्टविनायक ब्लड बँकेचे नरेंद्र मेरगू, जितेंद्र पलीकुंडवार, वनिता श्रीपत, नलिनी मुसळे, समीक्षा टाके, वंदना देसाई आणि गुलाब शेख यांचे सहकार्य लाभले. तसेच मंडळाचे पदाधिकारी व स्थानिक नागरिकांनीही सहभाग नोंदवत कार्यक्रम यशस्वी केला.

हनुमान जयंतीसारख्या पवित्र दिवशी रक्तदानासारखा समाजोपयोगी उपक्रम राबविल्याने नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण झाली. भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन करून गरजू रुग्णांना मदत करण्याचा संकल्प आयोजकांनी व्यक्त केला.

# अंतरात्म्याला ध्यानधारणेने शुद्ध करून रोज थोडावेळ ध्यान केल्याने परमेश्वराशी नाते दृढ होते

### संत राजिंदर सिंहजी महाराज यांचे प्रतिपादन

नगर - आपले उद्दिष्ट मिळवण्यासाठी सर्वांनी आध्यात्मिक मार्गावर चालून प्रयत्न केल्यास अधिकाधिक प्रगती होईल. जगात जशी प्रगती होत आहे तशीच आपल्या अंतर्मनातही प्रगती होणे आवश्यक आहे. ज्यांना परमात्म्याला प्राप्त करायचे आहे त्यांनी स्वतःला ओळखून आपल्या अंतरात्म्याला ध्यानधारणेने शुद्ध करणे आवश्यक आहे. भरकटलेली बुद्धी एकाग्र करण्यासाठी ध्यान हा सर्वोत्तम मार्ग आहे. त्यामुळे रोज थोडावेळ ध्यान कल्याने परमेश्वराशी नाते दृढ होते. सत्संगातून मिळणारे ज्ञान जीवन अधिक समृद्ध व सुखकर बनवते. त्यामुळे अशा आध्यात्मिक पर्वणीचा लाभ प्रत्येकाने घ्यावा. अहिल्यानगरमध्ये एवढ्या मोठ्या मंडपात मोठ्या संख्येने आलेल्या भाविकांना पाहून माझ्या मनात आनंदाला भरती आली आहे, आशा शब्दात आध्यात्मिक संत राजिंदर सिंहजी महाराजांनी अहिल्यानगरमध्ये भाविकांना मार्गदर्शन करून ध्यानाचे महत्व सांगितले.



अध्यात्मिक संतसद्गुरु संत राजिंदर सिंहजी महाराज यांचे अहिल्यानगरमध्ये आगमन झाल्यावर देश विदेशातील हजारो भाविकांनी त्यांच्या दर्शनाचा लाभ घेतला.

### सद्गुरूंच्या भेटीने भाविकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू, अहिल्यानगर मधील दर्शन व प्रवचन सोहळ्यास देश विदेशातून हजारो भाविकांची उपस्थिती

अध्यात्मिक संतसद्गुरु आणि सावन कृपाल रूहानी मिशनचे प्रमुख संत राजिंदर सिंहजी महाराज यांचे मंगळवार सायंकाळी अहिल्यानगरमध्ये आगमन झाले. मिस्कीननगर येथील कार्यक्रम स्थळी देश विदेशातून आलेल्या हजारो भाविकांनी त्यांचे जयजयकार करत टाळ्यांचा कडकडाट करून भक्तिभावाने स्वागत करून त्यांच्या दर्शनचा लाभ घेतला. यावेळी महाराजांनी प्रसन्न भावमुद्रेने उपस्थिती भाविकांना हात जोडून अभिवादन केले. अहिल्यानगर जिल्ह्यातील सावन कृपाल आश्रमच्या विविध सेंटरमधील छोट्या मुलामुलींनी 'आज सद्गुरु आये, सब के जीवके भाग जगाये' या स्वागत गीताने महाराजांचे स्वागत केले. दोन दिवसाच्या या सोहळ्याच्या पहिल्याच दिवशी महाराजांच्या दर्शनासाठी हजारो भाविक नगर जिल्ह्यासह देश विदेशातून उपस्थित होते. सद्गुरूंच्या दर्शनाने अनेक भाविकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले.

यावेळी संत राजिंदर सिंहजी महाराजांनी उपस्थित हजारो भाविकांना ५ मिनिट डोळे बंद करून ध्यान करण्यास सांगून ध्यानाचे महत्व सांगून थोडक्यात मार्गदर्शन केले. त्यानंतर सजवलेल्या छोट्या इलेक्ट्रिक गाडीत बसून संपूर्ण मंडपाला फेरफटका मारून उपस्थीत भाविकांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्याशी हस्तदोलन करून आशीर्वाद दिले. यावेळी सद्गुरूंना भेटल्यावर अनेकांचे डोळे पाणावले.

संत राजिंदर सिंहजी महाराजांच्या दर्शन सोहळ्यानंतर उपस्थित भाविकांसाठी लंगर प्रसादाची तसेच इतर सर्व अत्यावश्यक सोय करण्यात आली. शिस्तीत पार पडलेल्या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी सावन कृपाल रूहानी मिशनचे शेकडो स्वयंसेवक व अहिल्यानगरचे पदाधिकारी व भाविक राबत होते.

मंगळवारी सायंकाळी सावेडी भागात पावसाच्या जोरदार सरी पडल्या. पण कार्यक्रमासाठी मिस्कीननगरच्या मैदानात उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक जर्मन हँगर पद्धतीचा वॉटरप्रूफ मांडवामुळे कार्यक्रमावर पावसाचा कोणताही परिणाम झाला नाही.



# तमिळनाडूतील मंदिर वर्षभरातून उघडते चार वेळाच!

## कॅलिडोस्कोप

तमिळनाडूच्या तंजावर जिल्ह्यातील एक मंदिर वर्षभर बंद राहते आणि फक्त कार्तिक महिन्याच्या सोमवारी उघडले जाते. हे बोड्डू अवुदैयार मंदिर अनोख्या परंपरा आणि रहस्यमय श्रद्धांसाठी प्रसिद्ध आहे. अनेकदा आपण शिवमंदिरात शिवलिंगाची पूजा करतो; परंतु बोड्डू अवुदैयार मंदिरात भगवान शिव यांची पूजा मूर्ती किंवा शिवलिंगाच्या स्वरूपात न करता तेथे असणाऱ्या एका मोठ्या वडाच्या झाडाला भगवान शंकर मानून केली जाते. तेथील लोक वडाच्या झाडाला शिवशंकराचा अवतार मानून मनोभावे पूजा करतात. त्याचबरोबर पूजा करताना प्रसाद म्हणून वडाची पाने आणि पवित्र पाणी अर्पण केले जाते.

**मंदिराच्या नावामागील मनोरंजक कथा**

तमिळनाडूच्या तंजावूर येथील या मंदिराला बोड्डू अवुदैयार मंदिर हे नाव कसे पडले, यामागेही एक मनोरंजक कथा आहे. आख्यायिकेनुसार, इथे वनगोबर आणि महागोबर हे दोन महान ऋषी चिंतनात गढले होते. देवापर्यंत पोहोचण्याचा सर्वोत्तम मार्ग कोणता, गृहस्थ जीवन की त्याग? यावर ते चर्चा करत होते. अशात भगवान शिवशंकर स्वत: पांढऱ्या रुईच्या झाडाखाली प्रकट झाले आणि त्यांनी ऋषीमुनींना संदेश दिला. या कारणास्तव या मंदिराच्या देवतेला पोड्डू अवुदैयार आणि मध्यपुरीश्वर असे म्हणतात.

**मंदिर ३६० दिवस बंद**

हे मंदिर वर्षभर बंद असते आणि केवळ कार्तिक महिन्यातील सोमवारीच भक्तांसाठी दरवाजे उघडले जातात. या दिवशी भगवान शिव त्यांच्या अनुयायांसह मंदिरातील झाडाशी एकरूप झाले, असे मानले जाते. या कारणास्तव दरवर्षी मध्यरात्री मंदिराचे दरवाजे उघडतात आणि विशेष पूजा केली जाते. इतर दिवशी हे मंदिर पूर्णपणे बंद असते.

**अनोखे दान**

दरवर्षी कार्तिक महिन्याच्या शेवटच्या सोमवारी हजारो भक्त शिवशंकाराच्या दर्शनासाठी येथे येतात आणि भगवान शिवाला विविध वस्तू अर्पण करतात. भाविक सोने, चांदी, पितळ, पैसे तसेच तांदूळ, डाळ, उडीद, मसूर, तीळ, नारळ, आंबा, चिंच, मिरच्या, भाज्या असे प्रसाद म्हणून अर्पण करतात. त्याचबरोबर भगवान शंकराला प्रसन्न करण्यासाठी काही लोक अगदी बकरी, कोंबडीदेखील प्रसाद म्हणून अर्पण करतात.

# ... ही क्रूरता नव्हे!



भारतीय समाजात कोणाच्याही आयुष्यातील लग्न हा विशेष प्रसंग असतो. लग्नामुळे नवे जीवन सुरू होते, लग्नामुळे दोन कुटुंबे एकरुप होतात. कुटुंबात पती आणि पत्नीच्या जबाबदाऱ्या समान असायला हव्यात. साधारणपणे, लग्नानंतर सासरच्या घरी राहायला येणाऱ्या नवीन सुनेकडून अनेक अपेक्षा केल्या जातात. सासू-सासऱ्यांच्या आवडीनिवडी, त्यांचे जेवण आणि आरोग्य, तसेच कुटुंबातील इतर सर्व सदस्यांची काळजी तिनेच घ्यावी, अशी अपेक्षा तिच्याकडून केली जाते.


सासरच्या मंडळींसाठी त्याग करण्याची आणि त्यांची सेवा करण्याची जबाबदारी केवळ सुनेचीच असते, असे मानले जाते. सासरचे घर मोठे असेल किंवा ते संयुक्त कुटुंब असेल, तर सुनेवरील जबाबदाऱ्यांचे आणि कर्तव्यांचे ओझे आणखीच वाढते. कदाचित याच कारणामुळे, आजकाल अनेक स्त्रिया लग्नानंतर आपल्या पतीसोबत स्वतंत्रपणे राहण्याला पसंती देत आहेत.

सासरच्या मंडळींसोबत राहणाऱ्या स्त्रियांना अनेक तडजोडी आणि त्याग करावे लागतात. त्यांनी सासू-सासरे, दीर किंवा नणंद यांची काळजी घेण्यात काही चूक केली तर सुनेला टोमण्यांचा सामना करावा लागतो. काही वेळा तर परिस्थिती आणखीच चिघळते. अलाहाबाद उच्च न्यायालयाने घटस्फोटाच्या एका याचिकेवर सुनावणी करताना एक महत्त्वपूर्ण विधान केले. कोर्टाने स्पष्ट केले, की सुनेने आपल्या वृद्ध सासू-सासऱ्यांची काळजी न घेणे या कृतीला क्रूरता किंवा 'गुन्हा' मानले जाणार नाही. कोर्टाने नमूद केले, की अशा बाबी अत्यंत वैयक्तिक स्वरूपाच्या असतात. त्यामुळे प्रत्येक कुटुंबातील अशा बाबींची सविस्तर तपासणी करणे कोर्टाला शक्य नसते. कोर्टाने असेही म्हटले, की पती घराबाहेर असताना केवळ त्याच्या आई-वडिलांची काळजी न घेणे, म्हणजे 'क्रूरता' होत नाही.

अलाहाबाद हायकोर्टाने स्पष्ट केले, की सासू-सासऱ्यांची काळजी घेणे हे पत्नीचे कायदेशीर कर्तव्य नाही. पत्नीचे प्राथमिक वैवाहिक कर्तव्य हे तिच्या पती आणि मुलांप्रती असते. याचा अर्थ असा, की सांस्कृतिक अपेक्षा आणि कायदेशीर जबाबदाऱ्या या नेहमीच एकमेकांशी सुसंगत असतातच असे नाही.

कोर्टाच्या मते, 'मातापित्यांचे आणि ज्येष्ठ नागरिकांचे पालनपोषण व कल्याण अधिनियम, २००७' अंतर्गत मुलावर आपल्या मातापित्यांची काळजी घेण्याची जबाबदारी असते. सूनबाई संयुक्त कुटुंबाचा भाग असली, तरी सासरच्या मालमत्तेवर तिचे कोणतेही अधिकार नसतात. संयुक्त कुटुंबामध्ये, पत्नीचे अधिकार केवळ पतीने स्वतः कमावलेल्या मालमत्तेपुरतेच मर्यादित असतात. पत्नीला सासरच्या मालमत्तेचा वारसा केवळ तिच्या पतीमार्फतच मिळू शकतो.

# युद्धामुळे देशभरातील इंटरनेट सेवा ठप्प होण्याची भीती




होर्मुजची सामुद्रधुनी हा भाग जगातील सर्वात मोठा, महत्त्वाचा आणि संवेदनशील विद्युत चेकपॉईंट मानला जातो. मुळात होर्मुजची सामुद्रधुनी केवळ तेल वाहतुकीसाठीच नव्हे तर डिजिटल पायाभूत सुविधांसमवेत डेटा वहनाच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाची आहे. त्याचा हातभार जागतिक स्तरावरील पायाभूत सुविधांमध्ये होतो.

सामुद्रधुनीच्या या भागात या सागरी मार्गाच्या तळाशी इंटरनेट डेटाचं वहन करणाऱ्या फायबर ऑप्टिक केबल्सचं प्रचंड मोठं जाळं आहे. परिणामी पश्चिम आशियामध्ये होर्मुझ सामुद्रधुनीच्या परिसरात युद्ध चिघळल्यास भारतासह अनेक देशांमधील इंटरनेट ठप्प होऊ शकतं अशीच भीती व्यक्त करण्यात येत आहे. जगातील बहुतांश इंटरनेट ट्रॅफिक हे उपग्रहांच्या माध्यमातून नव्हे तर ते या फायबर ऑप्टिक केबलच्या माध्यमातून अर्थात समुद्राच्या तळाशी असणाऱ्या केबलमधूनन जगभरात पसरतं. या सबमरिन केबलमध्ये ईमेल, आर्थिक देवाणघेवाणी, क्लाऊड डेटा, व्हिडीओ कॉल, मेसेज या आणि अशा अनेक डिजिटल कम्युनिकेशनची प्रक्रिया सुरळीतरित्या पार पाडते. होर्मुजची सामुद्रधुनी आखाती देशांसह युरोपला आशिया खंडाशी जोडण्याचं महत्त्वाचं काम करते. तिथूनच या केबलसुद्धा भौगोलिकदृष्ट्या दूर असणाऱ्या भागांना एकमेकांशी जोडतात.

इंटरनेट केवळ उपग्रहांद्वारे चालतं असा समज आहे. तो चुकीचा नसला तरी जगातील बहुतांश इंटरनेटचं वहन समुद्राखालील फायबर ऑप्टिक केबल्सद्वारे होतं. भारताची आंतरराष्ट्रीय इंटरनेट कनेक्टिव्हिटी प्रामुख्याने अरबी समुद्रातून आखाती प्रदेश आणि युरोपला जाणाऱ्या केबल्सवर अवलंबून आहे. या केबल्सचा मोठा भाग होमुझच्या सामुद्रधुनीतून जातो. भारतातून पश्चिमेकडे जाणाऱ्या इंटरनेट ट्रॅफिकपैकी जवळपास एक तृतीयांश डेटा हा या क्षेत्रातून जाते. तो सामान्यांच्या अनेक महत्त्वाच्या गरजा पूर्ण करण्याची मदत करतो. या डेटा केबल्सचं नुकसान झाल्यास डिजिटल सर्विस, क्लाऊड कम्प्युटिंग प्लॅटफॉर्म, इंटरनॅशनल बँकिंग आणि फायनॅन्शिअल नेटवर्क, जागतिक व्यवसाय, सोशल मीडिया, ओटीटी अशा अनेक सुविधांवर परिणाम होऊ शकतो.

भारतातील इंटरनॅशनल ट्रॅफिकचा मोठा भाग युरोपात पोहोचण्यापूर्वी अरबी समुद्र आणि खाडी भागातून या पाण्याखाली असणाऱ्या केबलच्या माध्यमातून पश्चिमेला जातो. देशातून पश्चिमेकडे जाणारा जवळपास एक तृतीयांश डेटा होर्मुज किंवा त्याच्या जवळून जाणाऱ्या नेटवर्कमधूनच पुढे जातो. पाण्याखाली असणारं हे केबलचं जाळं कुवेत, कतार, बाहरिन, इराक, संयुक्त अरब अमिराती अशा आखाती देशांना कनेक्टिव्हिटी पुरवतं. त्यामुळं होर्मुजवर येत्या काळात काहीही परिणाम झाल्यास तिथं असणाऱ्या केबलचं नुकसान होऊन एक मोठं अदृश्य संकट संपूर्ण जगापुढं उभं ठाकेल, हेच खरं.

# सरबतावर गॅस क्रायसिस चार्ज?




देशभरात एलपीजी सिलिंडरचा तुटवडा भासत आहे. व्यावसायिक सिलिंडर मिळत नसल्यानं हॉटेल व्यावसायिक अडचणीत आले आहेत. अनेक ठिकाणी हॉटेल्स बंद करण्याची वेळ आली असून हजारो कर्मचाऱ्यांवर बेरोजगारीचं संकट ओढावलं आहे. दिल्ली, बंगळुरू, मुंबई, पुण्यासह अनेक मोठ्या शहरांमध्ये रेस्टॉरंटसह रस्त्याच्या कडेला लागणारे स्टॉल्स बंद झाले आहेत. आता बेंगळुरूतील एका कॅफमध्ये चक्क बिलात गॅस क्रायसिस चार्ज वसूल केला जात असल्याचे समोर आले आहे!.

'सोशल मीडिया'वर एका युजरने बिलाचा फोटो शेअर केला असून तो व्हायरल झाला आहे. या बिलात दोन लिंबू सरबत घेतल्याचा उल्लेख आहे. त्यासोबतच एक असं शुल्क जोडण्यात आलं आहे, ज्यामुळे सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. लिंबू सरबतावरही 'गॅस क्रायसिस चार्ज' आकारण्यात आला आहे. किंमतीच्या पाच टक्के गॅस क्रायसिस चार्ज आकारला असून आता या बिलाची चर्चा 'सोशल मीडिया'वर रंगली आहे.

'द कॅफे' या बेंगळुरूतील कॅफेचं हे बिल आहे. या बिलानुसार ग्राहकाने दोन पुदिना लिंबू सरबत मागवले होते. एका सरबताची किंमत १७९ रुपये आहे. दोन सरबताचं बिल ३५८ रुपये होतं. यावर ५ टक्के सूट दिली, तर जीएसटी पाच टक्के लावला आहे. याशिवाय अधिकचा गॅस क्रायसिस चार्ज तब्बल ५ टक्के जोडला आहे. ग्राहकाच्या हातात एकूण ३७४ रुपयांचं बिल सोपवण्यात आलं.

'गॅस क्रायसिस चार्ज' आकारण्याबाबत लोकांचा आक्षेप नाही. पण लिंबू सरबताला तयार करायला कोणत्या गॅसचा वापर केला, असा प्रश्न अनेकांनी विचारला.


# नौदलातील ड्युटी खडतर



माणूस काही मिनिटांसाठी पाण्याखाली राहू शकतो; मात्र सैनिक अनेक महिने या पाणबुड्यांमध्ये पाण्याखाली राहतात. पाणबुडी पाण्याखाली फिरणारे जहाज नाही. पाणबुड्या या एक सीलबंद जीवन-समर्थन प्रणाली आहे. यामध्ये क्रूसाठी हवा निर्माण केली जाते. पाणबुडीत राहणे म्हणजे बंद स्टील सिलेंडरमध्ये राहण्यासारखे आहे. पाणबुडीत काम करताना अतिशय कठीण परिस्थितींचा सामना करावा लागतो. याचा शरीरावर देखील दीर्घकालीन परिणाम होतो.

भारताने पहिल्यांदा डिसेंबर १९६७ मध्ये पाणबुडी ऑपरेशन सुरू केले. जवळजवळ ५८ वर्षांनंतरही, पाणबुडीत दीर्घकाळ राहिल्यामुळे होणाऱ्या आरोग्य परिणामांवर कोणताही व्यापक सार्वजनिक अभ्यास झालेला नाही. पाणबुडी सेवेत सामील होण्यापूर्वी खलाशांना विशेष प्रशिक्षण दिले जाते. विशाखापट्टणम येथील प्रशिक्षण केंद्रात, उमेदवारांना पाण्याने भरलेल्या टॉर्पेडो ट्यूबमधून खोलीपासून पृष्ठभागावर पोहण्याची चाचणी उत्तीर्ण करावी लागते. या चाचणी दरम्यान चिंताग्रस्ततेवर नियंत्रण ठेवणे महत्त्वाचे मानले जाते. या चाचणीत अपयशी ठरणाऱ्यांना पाणबुडी सेवेसाठी अयोग्य घोषित केले जाते.


पाणबुडीतील हवा नैसर्गिक नसते. ऑक्सिजन आणि कार्बन डायऑक्साइडची पातळी रासायनिक प्रणालींद्वारे नियंत्रित केली जाते. या वातावरणात दीर्घकाळ राहिल्याने थकवा, सौम्य डोकेदुखी आणि एकाग्रता कमी होऊ शकते. याव्यतिरिक्त, पाणबुडीवर दिवस-रात्र चक्र उलटे असते. कधीकधी खलाशांना सूर्यप्रकाशाशिवाय ४५ ते ९० दिवस काम करावे लागते. याचा परिणाम शरीराच्या जैविक घड्याळावर होतो. जमिनीवर परतल्यानंतर सामान्य दिनचर्येत परतण्यासाठी वेळ लागतो. पाणबुडीतील जागा अत्यंत मर्यादित असते. कॉरिडॉर इतके अरुंद असतात की एकाच वेळी दोन लोक त्यातून जाऊ शकत नाहीत. व्यायामाच्या सुविधा जवळजवळ अस्तित्वात नाहीत. त्यामुळे दीर्घ मोहिमांनंतर स्नायूंना थकवा येऊ शकतो.



# ....असा हा विश्वविक्रम

फक्त एका दिवसात म्हणजे २४ तासात सात देश फिरण्याचा विचारही आपण करू शकत नाही. पण काही अवलिये अशा काही भन्नाट गोष्टी करत असतात. डेव्हिड कोबारी हा सुद्धा असाच एक तरुण. तो २४ तासांमध्ये सात देश फिरला. यानिमित्ताने त्याने एक विक्रमच प्रस्थापित केला आहे. त्याने पोलंडपासून या प्रवासाला सुरूवात केली. मग झेक रिपब्लिक, स्लोवाकिया, ऑस्ट्रिया, हंगेरी, स्लोवेनिया आणि क्रोएशिया या देशांना भेटी देत नवा विक्रम रचला. मास्टर्सचं शिक्षण घेणाऱ्या डेव्हिडला काही तरी वेगळं करायचं होतं. आनंदी रहायचं होतं. प्रसिद्धी मिळवण्यासोबतच लोकांना मदतही करायची होती. यासाठी मग त्याने देश फिरायचं ठरवलं. कमीत कमी वेळेत त्याने जास्तीत जास्त देश फिरण्याचा निर्णय घेतला. याआधीचे विक्रम तपासले. यामध्ये ग्लेन बर्मिस्टर २४ तासांमध्ये युरोपमधले चार देश फिरला होता. त्यानंतर कार्स्टेन कोहलरने पाच देश फिरून नवा विक्रम केला. यानंतर जर्मनीच्या मायकेल मॉलने २४ तासात सहा देश फिरण्याचा विक्रम केला. यामुळे डेव्हिडने सात देश फिरायचं ठरवलं. त्याने पोलंडपासून सुरुवात केली. दहा तासांनी पहिला ब्रेक घेतला. डेव्हिडने २४ तासांमध्ये ५०० किलोमीटर प्रवास केला. यामुळे त्याचं नाव गिनिज बुकमध्ये नोंदवलं गेलं.

# सेल्फीप्रेमी बकरी



सध्य अनेकजण वेगवेगळ्या पोझ देऊन सेल्फी, फोटो काढत असतात. काही पोझ खास सेल्फीसाठी तयार करण्यात आल्या आहेत. कॅमेरा समोर असेल तर अनेकांना उत्साहाचं भरतं येतं. फोटो क्लिक केले जातात. सोशल मीडियावर अपलोड होतात. मग एका बकरीलाही फोटो काढून घ्यायला खूप आवडतं. या बकरीचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले. समाजमाध्यमांमध्ये ती चर्चेचा विषय ठरला. ही बकरी मलेशियाची आहे. सनेन प्रजातीची ही बकरी आजही अनेकांचं लक्ष वेधून घेते. ती खूप गोंडस आहे. रोमोस असं तिचं नाव आहे. तिला फोटो काढून घ्यायला खूप आवडतं, असं तिच्या मालकांचं म्हणणं आहे. कॅमेरा समोर असेल तर ती वेगवेगळ्या पोझ द्यायला सुरूवात करते. तिच्या मालकाने रोमोसचा एक फोटो फेसबुकवर पोस्ट केला होता. या एका फोटोमुळे ती खूप लोकप्रिय झाली. रोमोसच्या या फोटोला असंख्य लाईक्स मिळाले. इथल्या एका शेताच्या मालकाकडे या प्रजातीच्या १७ पेक्षा अधिक बकऱ्या आहेत. पण रोमोस सगळ्यांपेक्षा वेगळी आहे. तिचा हटके अंदाज अनेकांना भावतो. रोमोसच्या डोक्यावर केस आहेत. यामुळे तिने हेअरस्टाईल केल्यासारखं वाटतं. तसंच फोटो काढताना तिच्या चेहऱ्यावरचे भावही बदलतात, एक स्मितहास्य उमटतं. खरं तर आपल्याला तसा भास होतो. यामुळे ती खूप वेगळी वाटते. सोशल मीडियावरील प्रसिध्दीमुळे अनेकजण रोमोसला खरेदी करण्याचा प्रस्ताव ठेवतात. पण मालकाला रोमोस हवी आहे.

# आता विश्वात्मके देवे... युध्द नको...

जगाच्या निर्मितीनंतर, माहीत असलेल्या कालखंडा नुसार आणि उपलब्ध असलेल्या माहितीनुसार आजपर्यंत किमान ५० हजार छोटे मोठे युद्ध या पृथ्वीवर झाले, आणि त्यामध्ये निष्पाप दीडशे कोटी लोकांचा म्हणजे सध्याच्या भारताच्या लोकसंख्ये इतक्या लोकांचा बळी गेला आहे. असंख्य कलाकृती, मुल्यवान साधनसामग्री आणि ज्ञानसंपदा बेचीराख झाली आहे, हजार वेळा या पृथ्वीचा, देशांचा, सीमांचा नकाशा रक्ताचा सडा मारून बदलला आहे. पण माणसाची महत्त्वाकांक्षा विध्वंसकच होत चालली आहे, आजची जागतिक परिस्थिती त्याचा पुरावा आहे. सुदैवाने आपल्या देशाला संस्कृती आणि ठोस अशा विचारधारांचे अधिष्ठान असल्यामुळे अजून तरी जीवघेणं अराजक आपल्याकडे माजलेलं नाही. तरीही ऑल इज वेल असं म्हणता येणार नाही. आपणही त्याच वाटेवर आहोत. आपल्याला बाहेरच्या युद्धापेक्षा आतले युद्धच विध्वंसक ठरणार आहे.




भगवान महावीर, गौतम बुद्ध, कृष्ण, अशा असंख्य पुण्यातम्यांनी विचारांचे अमर असे अणुरेणू येथे रुजवले, त्यामुळे काही आशेचे किरण आज शिल्लक आहेत. पण ते किरण सुद्धा काही समाजकंटक नष्ट करत आहेत. पूर्वीचे जागतिक पातळीवरचे युद्ध फक्त रेडिओवरून ऐकायला मिळायचे. आता या पिढीला जागतिक युद्धाच्या झळा थेट घरापर्यंत पोहोचण्याचा हा पहिलाच अनुभव असावा. कोरोनाच्या वाईट कालखंडामध्ये माणसं काही धडा घेतील, काही प्रमाणात सुधारतील, असे वाटले होते परंतु ते देखील स्मशान वैराग्यासारखे क्षणिक ठरले आणि माणसे पुन्हा तशीच बेदरकार वागू लागली. आता या युद्धानंतर सुद्धा काही धडा घेतील असे वाटत नाही. आपल्याला उपलब्ध असलेली साधनसामग्री, आपला चंगळवाद, समाजाप्रती असलेली आपली अनास्था, हेच दृश्य सगळीकडे आहे.

देशप्रेम, शिस्त, जागरूकता आणि संस्कृती हे शब्द आता या युद्धाच्या बॉम्बस्फोटाच्या आवाजामध्ये तर पूर्णपणे बेचिराख झालेले दिसतात, अमेरिकेच्या राक्षसी साम्राज्यवादा चा परिणाम म्हणून डॉलर दादागिरी मुळे हे युद्ध सुरू झाले आणि सगळे जग त्याच्या मध्ये होरपळायला लागलेले आहे, स्वसंरक्षणाच्या नावाखाली माझ्या स्वतः च्या घरात क्षेपणास्त्र, अणुबॉंब, ठासून भरलेले असले पाहिजेत, मात्र दुसऱ्या देशाकडे ते अजिबात असू नयेत, माझीच दादागिरी सगळीकडे चालली पाहिजे अशा अविर्भावामुळे ट्रम्प नावाच्या महामुर्ख शिरोमणी माणसाने जगाला वेठीला धरले, आणि शरण नाही तर मरण या नियमाने भारतासहित सगळेच देश याबाबत ब्र शब्द काढायला तयार नाहीत. भारताच्या रुपयाने तर डॉलर पुढे साक्षात लोटांगण घातले आणि मागील १४ वर्षात इतकं अवमूल्यन झालं नसेल इतकं अवमूल्यन झालं आहे., आपल्याकडे सामान्य माणसाला अजून ही भाषा समजत सुध्दा नाही. त्यांना फक्त पेट्रोल डिझेल सिलेंडर महागले एवढेच समजते.

आम्ही अजून पण याचा झेंडा, त्याचा झेंडा, याचे भक्त, त्याचे चमचे, जात, पात, धर्म युद्ध, आणि एकमेकांवर घरात बसल्या बसल्या सोशल मीडियावर टीकाटिपण्या, शिव्या, शाप, यांचा बॉंब वर्षाव, ड्रोंण हल्ले करण्यामध्येच धन्यता मानत आहोत, आम्हाला अशा सोशल मीडिया वरच्या स्वकीयांबरोबरच चालू असलेल्या महायुद्धांचा फार मोठा अनुभव आहे. मिनिटाच्या भाषेत बोलायचं झालं तर गार्डियन सर्व्हे आकडेवारीनुसार युद्ध सुरू होऊन ४५ हजार मिनिटे झाली आहेत. या ४५ हजार मिनिटांमध्ये दोन्ही बाजूंकडून तीस हजार क्षेपणास्त्र ड्रोण आणि बॉम्ब वापरण्यात आले, आतापर्यंत ८७०० नागरिक मृत्युमुखी पडले ३४००० नागरिक गंभीर जखमी आहेत, सर्वात महत्त्वाचे म्हणजे भारताचा वार्षिक अर्थसंकल्प ५० लाख कोटी रुपयांचा असतो, बरोबर तेवढीच रक्कम या युद्धामध्ये आत्तापर्यंत एका महिन्यात नामशेष झालेली आहे,

इराण हा देश दररोज अकराशे कोटी रुपयांचं तेल निर्यात करत होता, आणि तोच त्यांच्या देशाचा आर्थिक स्त्रोत आहे, परंतु गेल्या ३१ दिवसापासून ते सर्व बंद झाल्यामुळे एकट्या इराणचे १३ लाख कोटी रुपये बुडले आहेत, त्यामुळे तेथील चार कोटी नागरिक थेट दारिद्र रेषेखाली ढकलले गेले आहेत, काय दोष होता त्यांचा? सगळ्या जगाची हालचाल इंधना च्या जोरावर चालते ते इंधन ते देत होते हाच दोष का? असं काय बिघडवलं होतं त्या इराणने की त्याला संपवायचाच असा चंग या मूर्ख माणसाने बांधला? आणि सगळ्या जगाला विध्वंसाच्या खाईत लोटून दिलं..? हा विध्वंस करण्यासाठी अमेरिका दररोज एक बिलियन डॉलर म्हणजे ९०००० कोटी रुपये या युद्धावर खर्च करते आहे. अमेरिकेमध्ये या सत्तापिपासू ट्रम्प विरोधी आजपर्यंतचे सर्वात मोठे जन आंदोलन रस्त्या रस्त्यांवर उभे राहिले आहे, परंतु त्याचे डोळे उघडत नाहीत. अहंकार हा स्वतःलाच नाही तर संपूर्ण जगाला किती घातक ठरू शकतो त्याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे.

एकंदर जगाचा, पैशांचा साधनसामग्रीचा माणसांच्या जीवांचा अंत याबरोबरच अतिशय महत्वाचे म्हणजे अतिशय गंभीर असे परिणाम पर्यावरणावर होत आहेत होमूर्झ च्या सामुद्रधुनी मध्ये बॉम्ब पडलेल्या तेलाच्या टॅंकर जहाजांमुळे आतापर्यंत दीड हजार किलोमीटरच्या समुद्रामध्ये तेलाचा तवंग पसरलेला आहे, आकाशात धुळीचे आणि तेलाचे धुराचे लोट पसरलेले आहेत, द्रोण क्षेपणास्त्र आणि बॉम्ब यामुळे पृथ्वीच्या वातावरणाचा ओझोनथर नष्ट होऊन कधीही न भरून येणारा विध्वंस सुरू झाला आहे. इराण आपल्यापासून अवघ्या तीन हजार किलोमीटर एरियल अंतरावर आहे त्यामुळे मी इथे माझ्या घरात सुरक्षित आहे असं समजणारा मूर्खच ठरेल. कोरोना नावाच्या एका सूक्ष्म व्हायरसने २४ तासात जग व्यापले होते हे विसरता कामा नये. आपल्या पुढच्या पिढीला पाठीवर ऑक्सिजनचं सिलेंडर घेऊन धुराने व्यापलेल्या काळ्याकुट्ट आकाशाखाली जगावे लागेल एकेक झाड शोधावे लागेल हे सांगण्यासाठी कुठल्या ज्योतिषाची आवश्यकता नाही.

हे सगळं उघड्या डोळ्यांनी पाहताना याला कारणीभूत असलेला स्वतःला लोकशाही प्रणालीचा देश म्हणणाऱ्या अमेरिकेला त्या वेड्या माणसाच्या नाकात वेसण घालता येत नाही, लोकशाही म्हणजे चेक्स ॲण्ड बॅलेन्सेस असं म्हटलं जातं. कुठे आहे काउंटर फोर्स? सत्ता ही माणसाला आंधळी शक्ती तरी देते किंवा डोळस षंढपणा तरी देते. एकंदर काय तर मला काय त्याचे? या अविर्भावात आपण जगताना जागतिक महायुद्ध आता आपल्याच स्वयंपाक घरात सुरू झाले आहे. कधीच आत्मपरीक्षण करायचं नाही, कधीच शहाणं व्हायचं नाही, अशी आपण शपथ घेतली आहे की काय? असे वाटते.. युद्ध थांबेल किंवा थांबणारही नाही कदाचित! काहीही झालं तरी त्याचे परिणाम खूप दुरगामी आहेत आणि आपण असेच इंधनाच्या बाबत, पाण्याच्या वापराबाबत, शिस्तीच्या बाबत, जीवन मूल्यांबाबत बेदरकार वागत राहिलो तर भस्मासुरासारखे स्वतःच्याच डोक्यावर हात ठेवून आपण भस्म होणार आहोत.

आठशे वर्षांपूर्वी माऊलींनी विश्वात्मके देवाला साकडं घातलं होतं.. ते त्या देवाला अजूनही ऐकायला येऊ नाही हेच आपलं दुर्दैव! यदा कदाचित असलाच कोणी या विश्वाचा तारणहार..तर तो सुद्धा आंधळा मुका आणि बहिरा झालाय की काय? असे वाटू लागते..

– **सुहासभाई मुळे,** अध्यक्ष, जागरूक नागरीक मंच, ९८२३७२२२१२



अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने आयोजित कॅन्सर मोबाईल व्हॅन जनजागृती शिबिराचे उद्घाटन महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते झाले. (छाया : लहू दळवी)

# 'कॅन्सर' मुक्तीसाठी लोकचळवळीची गरज

**महापौर ज्योतीताई गाडे यांचे प्रतिपादन, महापालिकेच्या कॅन्सर मोबाईल व्हॅन जनजागृती शिबिराचे उद्घाटन**

नगर – देशात कॅन्सरग्रस्त रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असून मृत्यूचे प्रमाणही चिंताजनक आहे. या पार्श्वभूमीवर कॅन्सर रोखण्यासाठी समाजामध्ये व्यापक जनजागृती होणे अत्यंत आवश्यक असून यासाठी लोकचळवळ उभी राहणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले.

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने आयोजित कॅन्सर मोबाईल व्हॅन जनजागृती शिबिराचे उद्घाटन महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते झाले. यावेळी आयुक्त यशवंत डांगे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, महिला व बालकल्याण समिती उपसभापती वर्षा सानप, नगरसेवक महेश लोंढे, संदीप दातरंगे, रोहन सानप, अभिजीत बोरुडे, डॉ. दिलीप बागल, डॉ. सृष्टी बनसोडे, डॉ. साहिल शेख, योगेश औटी, विकास गीते आदींसह अधिकारी व आरोग्य विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

महापौर ज्योतीताई गाडे यांनी सांगितले की, व्यसनाधीनतेमुळे कॅन्सरचे प्रमाण वाढत असून आजाराचे लवकर निदान व उपचार होणे अत्यंत गरजेचे आहे. महापालिकेच्या माध्यमातून शहरातील आरोग्य केंद्रांमध्ये कॅन्सर मोबाईल व्हॅनद्वारे नागरिकांमध्ये जनजागृती केली जाणार आहे.

उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी सांगितले की, महापालिकेच्या माध्यमातून नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा देण्याचे काम सुरू असून शासनाच्या विविध योजना थेट रुग्णांपर्यंत पोहोचवल्या जात आहेत. कॅन्सर मोबाईल व्हॅनच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती होऊन आजाराचे तातडीने निदान व उपचार होणे शक्य होईल.

आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले की, या जनजागृती शिबिरामध्ये ३० वर्षांवरील महिलांसाठी स्तन व गर्भाशय मुखाचा कर्करोग तपासणी, तसेच ३० वर्षांवरील स्त्री–पुरुषांसाठी मुखाच्या कर्करोगाची तपासणी केली जाणार आहे. याशिवाय क्षयरोग मोहिमेअंतर्गत छातीचा एक्स–रेसह विविध वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. नागरिकांनी या सुविधांचा लाभ घेऊन आपल्या आरोग्याची नियमित तपासणी करावी, असे आवाहन त्यांनी केले.

कर्करोग टाळण्यासाठी व्यसनमुक्ती अत्यंत आवश्यक असून नागरिकांनी आपल्या आरोग्याबाबत जागरूक राहणे गरजेचे असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

# कर्जत, श्रीरामपूर उपजिल्हा रुग्णालयात वैश्विक दिव्यांग प्रमाणपत्र प्रणाली कार्यान्वित

नगर – जिल्ह्यातील कर्जत तसेच श्रीरामपूर येथील उपजिल्हा रुग्णालयांमध्ये नवीन वैश्विक दिव्यांग प्रमाणपत्र वितरण प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. यामुळे जिल्ह्यातील अस्थिव्यंग तसेच नेत्र दिव्यांगत्व असलेल्या नागरिकांची मोठी गैरसोय टळणार असून प्रमाणपत्र मिळवण्यासाठी त्यांचा होणारा प्रवास व वेळ वाचणार आहे, अशी माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय घोगरे यांनी दिली आहे.

पुणे येथील दिव्यांग कल्याण आयुक्तालयाकडून या प्रणालीसाठी आवश्यक युजर आयडी व पासवर्ड उपलब्ध करून देण्यात आला आहे. सदर रुग्णालयांमध्ये दिव्यांग बोर्डातील तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत रुग्णांची तपासणी करून त्यांना प्रमाणपत्रे वितरित केली जातील.

प्रशासनाने रुग्णांच्या सोयीसाठी तालुकानिहाय दिवस निश्चित केले असून श्रीगोंदा, जामखेड व कर्जत तालुक्यातील रुग्णांची वैद्यकीय तपासणी उपजिल्हा रुग्णालय कर्जत येथे महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी करण्यात येईल. तसेच अकोले, संगमनेर, कोपरगाव, राहाता व श्रीरामपूर येथील रुग्णांसाठी उपजिल्हा रुग्णालय श्रीरामपूर येथे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या बुधवारी दिव्यांग तपासणी व प्रमाणपत्र वितरण शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे.

या नव्या सुविधेमुळे दिव्यांग बांधवांची होणारी हेळसांड थांबण्यास मदत होणार असून संबंधित तालुक्यातील सर्व दिव्यांग बांधवांनी आपल्या जवळच्या आरोग्य संस्थेत उपस्थित राहून या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहनही श्री.घोगरे यांनी केले आहे.



# श्रीराम जन्मोत्सव उत्साहात

नगरमध्ये श्रीराम जन्मोत्सव स्वकुळसाळी हितसंवर्धक मंडळाच्या वतीने बागडपट्टी मधील भगवान जिव्हेश्वर मार्ग येथील समाजाच्या लक्ष्मीनारायण मंदिरात उत्साहात झाला.

# एमआयडीसी परिसरात तरुणावर कोयत्याने हल्ला करून अपहरण

## चौघांवर गुन्हा दाखल

नगर – एमआयडीसी भागातील क्रॉम्प्टन कंपनीसमोर भरदुपारी एका तरुणावर जीवघेणा हल्ला करून त्याचे अपहरण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी अक्षय दत्तात्रय गवळी (वय २९, रा. नवनागापूर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ३१ मार्च दुपारी १२ वाजेच्या सुमारास प्रवीण ज्ञानदेव मोरे हा तरुण राजामाणूस एंटरप्राइजेस जवळ असताना, आरोपी संजय ठोंबरे (रा. आदर्शनगर), सत्यम कासार, आलोक चारोडे (दोघे रा. अस्तगाव, ता. पारनेर) आणि एका अनोळखी इसमाने संगनमत करून त्याच्यावर हल्ला केला. आरोपींनी प्रवीणला जीवे मारण्याच्या उद्देशाने त्यांच्या ताब्यातील चारचाकी गाडीने (एमएच १६ डीसी ६६९१) जोराची धडक दिली.

या अपघातानंतर आरोपींनी प्रवीणवर कोयत्याने वार करून त्याला गंभीर जखमी केले. एवढ्यावरच न थांबता, रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या प्रवीणला आरोपींनी जबरदस्तीने गाडीत टाकून पळवून नेले. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी आणि एमआयडीसी पोलीस स्टेशनचे अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून गुन्ह्यात वापरलेली चारचाकी गाडी निष्पन्न झाली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जाधव करत आहेत.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या विक्रीचा व्यवहार केलेला आहे. **सदर मिळकत हि विद्यमान मालक यांचे मालकीची असून** त्यांच्याच प्रत्यक्ष कब्जात व ताब्यात आहे. सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असा खरेदी देणाराने म्हणजेच विद्यमान मालकाने खात्री व भरवसा दिला आहे. तथापि कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते की,सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बॅंक बोजा, भाडेकरार,साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीज, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसाचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. तसेच हरकत न कळवीता परस्पर वर्तमान पत्रातून जाहीर केलेल्या हरकतींची काही एक दखल घेतली जाणार नाही. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक –०१/०४/२०२६

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर), पोटतुकडी नगरपैकी, तालुका नगरपैकी, **महानगरपालिका** हद्दीतील, **मौजे केडगांव** येथील **सर्व्हे नंबर ४७/१अ१ मधील** खालील वर्णनांची मिळकत-

| प्लॉट नंबर | क्षेत्रफळ चौ.मी. | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| २० | १७६.०० | लागू सर्व्हे नंबर ४६ | प्लॉट नंबर १९ | ९.०० मी रुंदीचा रस्ता | प्लॉट नंबर २१ |
| २१ | १७६.०० | लागू सर्व्हे नंबर ४६ | प्लॉट नंबर २० | ९.०० मी रुंदीचा रस्ता | प्लॉट नंबर २२ |
| ५७ | २३८.६९ | ९.०० मी रुंदीचा रस्ता | प्लॉट नंबर ५२ | प्लॉट नंबर ५६ | १२.०० मी रुंदीचा रस्ता |
| ५८ | २२३.३३ | ९.०० मी रुंदीचा रस्ता | १२.०० मी रुंदीचा रस्ता | सर्व्हे नंबर ४७पैकी | प्लॉट नंबर ५९ |
| ५९ | १९१.१० | ९.०० मी रुंदीचा रस्ता | प्लॉट नंबर ५८ | सर्व्हे नंबर ४७पैकी | सर्व्हे नंबर ४७पैकी |
| ६० | २७५.८० | प्लॉट नंबर ६१ | १२.०० मी रुंदीचा रस्ता | ९.०० मी रुंदीचा रस्ता | सर्व्हे नंबर ४७पैकी |
| ६१ | २२८.२१ | प्लॉट नंबर ६२ | १२.०० मी रुंदीचा रस्ता | प्लॉट नंबर ६० | सर्व्हे नंबर ४७पैकी |
| ६२ | २३०.७२ | लागू सर्व्हे नंबर ४६ | १२.०० मी रुंदीचा रस्ता | प्लॉट नंबर ६१ | सर्व्हे नंबर ४७पैकी |

सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री राहुल कुंडलिक जगताप
रा. पिंपळगांव पिसा, श्रीगोंदा, अहिल्यानगर (अहमदनगर)

**ॲड.प्रणव सुधीर धर्माधिकारी, ॲड.सौ.नूतन प्रणव धर्माधिकारी**
मो : ९०२८००८२००, पत्ता : भंडारी सावज अपार्टमेंट, कोठी रोड, अहिल्यानगर (अहमदनगर)



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या विक्रीचा व्यवहार केलेला आहे. **सदर मिळकत हि विद्यमान मालक यांचे मालकीची असून** त्यांच्याच प्रत्यक्ष कब्जात व ताब्यात आहे. सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असा खरेदी देणाराने म्हणजेच विद्यमान मालकाने खात्री व भरवसा दिला आहे. तथापि कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि,सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बॅंक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीज, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसाचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. तसेच हरकत न कळवीता परस्पर वर्तमान पत्रातून जाहीर केलेल्या हरकतींची काही एक दखल घेतली जाणार नाही. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक–०१/०४/२० २६

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन :** जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर), पोटतुकडी नगरपैकी, तालुका नगरपैकी, **महानगरपालिका** हद्दीतील, **मौजे केडगांव** येथील **सर्व्हे नंबर ४७/१ अ १** मधील खालील वर्णनांची मिळकत–

| प्लॉट नंबर | क्षेत्रफळ चौ.मी. | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १८ | १७६.०० | लागू सर्व्हे नंबर ४६ | प्लॉट नंबर १७ | ९.०० मी रुंदीचा रस्ता | प्लॉट नंबर १९ |
| १९ | १७६.०० | लागू सर्व्हे नंबर ४६ | प्लॉट नंबर १८ | ९.०० मी रुंदीचा रस्ता | प्लॉट नंबर २० |
| ५२ | १७६.०० | ९.०० मी रुंदीचा रस्ता | प्लॉट नंबर ५१ | प्लॉट नंबर ५३ व ५६ | प्लॉट नंबर ५७ |
| ५३ | २०४.०० | प्लॉट नंबर ५१ व ५२ | ९.०० मी रुंदीचा रस्ता | प्लॉट नंबर ५४ | प्लॉट नंबर ५६ |
| ५४ | २०६.८९ | प्लॉट नंबर ५३ | ९.०० मी रुंदीचा रस्ता | सर्व्हे नंबर ४७पैकी | प्लॉट नंबर ५५ |
| ५५ | २१८.९४ | प्लॉट नंबर ५६ | प्लॉट नंबर ५४ | सर्व्हे नंबर ४७पैकी | १२.०० मी रुंदीचा रस्ता |
| ५६ | २४१.१४ | प्लॉट नंबर ५७ व ५२ | प्लॉट नंबर ५३ | प्लॉट नंबर ५५ | १२.०० मी रुंदीचा रस्ता |

सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री बंडु आप्पासाहेब धारकर
रा. पिंपळगांव पिसा, श्रीगोंदा, अहिल्यानगर (अहमदनगर)

| प्लॉट नंबर | क्षेत्रफळ चौ.मी. | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| ॲमिनीटी | ९८२.०१ | ९.०० मी रुंदीचा रस्ता | १८.०० मी रुंदीचा डि पी रस्ता | ओपन स्पेस | ओपन स्पेस |

सदर मिळकतीचे विद्यमान मालक १.श्री बंडु आप्पासाहेब धारकर २.श्री राहुल कुंडलिक जगताप नंबर १व२ रा. पिंपळगांव पिसा, श्रीगोंदा, अहिल्यानगर (अहमदनगर)
३. श्री आशिष रामराव भोसले रा. बेलवंडी बुद्रुक, श्रीगोंदा, अहिल्यानगर (अहमदनगर)

**ॲड.प्रणव सुधीर धर्माधिकारी, ॲड.सौ.नूतन प्रणव धर्माधिकारी**
मो : ९०२८००८२००, पत्ता : भंडारी सावज अपार्टमेंट, कोठी रोड, अहिल्यानगर (अहमदनगर)



## जाहीर नोटीस

आमचे आशिल महेंद्र मोतीलाल कांकरिया रा. माणिकनगर आनंदऋषीजी हॉस्पीटलमागे, अहिल्यानगर यांनी दिलेल्या माहितीवरुन व त्यांच्या विनंतीनुसार आमच्या आशिलाच्या वतीने अशिलाकरीता या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

१. प्रस्तुत टिपी स्किम नं. ४ फायनल प्लॉट नं. ११० मध्ये आमच्या आशिलासह त्यांचे बंधू कै. पारस मोतीलाल लोढा यांचे वारस कै. राजेंद्र मोतीलाल लोढा यांचे वारस तसेच कै. विरेंद्र मोतीलाल लोढा यांचे वारस त्याचप्रमाणे श्री.निखिल मोतीलाल लोढा, श्री. सुरेंद्र मोतीलाल लोढा यांच्या एच.यु.एफ. कुटुंबाची मिळकत आहे आणि त्यानुसार त्यांनी कुटुंबाच्या वेगवेगळ्या सदस्यांच्या नावाने मिळकतीच्या खरेदी घेतलेल्या आहेत.

२. याबाबत कै. विरेंद्र मोतीलाल लोढा यांचे पुत्र मोनेश विरेंद्र लोढा यांनी फेर नं. ८५० व ८५१ च्या आधारे चुकीची, खोटी, माहिती देवुन चुकीचे व खोटे दस्त तयार करुन फेर नं. ८५० व ८५१ ची अंमलबजावणी बेकायदेशीररित्या करुन घेतली आणि सदर मिळकतीची पोट फाळणी व आमच्या आशिलाच्या संमतीविना बेकायदेशीरित्या खाजगी पध्दतीने करुन त्याची सरकारी सामिलीनिकरण करुन त्याची अंमलबजावणी फेर नं. २१८१ द्वारे नगर भूमापन अहमदनगर यांच्याकडून मंजूर करुन घेतल्याचा मिळकत उताऱ्यावर तशी नोंद दिसून येते.

३.वास्तविकआमच्याआशिलानेवत्यांच्याकुठल्याहीकौटुंबिकसदस्यांनेसदर मिळकतीमध्ये त्यांच्या अविभक्त हिश्याचा, अविभाज्य हिश्याचा कुठल्याही प्रकारे कौटुंबिक वाटप, रजिस्टर वाटप किंवा कोर्ट वाटपाने वाटप करुन घेतलेले नसतांना तसेच सदर मिळकतीचे कुठल्याही प्रकारे कुठल्याही रेखांकनाद्वारे व कुठल्याही लेआऊटद्वारे कोणत्याही प्रकारे सब लेआऊट केलेला नाही, पोट फाळणी केलेली नाही आणि कुठल्या एचयूएफ सदस्याचे किती क्षेत्र आहे हे वाटप करुन निश्चित केलेले नसतांना फेर नं. ८५०,८५१,२१८१ हे बनावटरित्या बोगस व चुकीच्या माहितीच्या आधारे मोनेश विरेंद्र लोढा यांनी नगर भूमापक अधिकाऱ्यांना माहिती दिली आणि नगर भूमापक अधिकारी यांनी कागदपत्रांची शहनिशा न करता सदरचे फेर मंजुर केले.

४. याबाबत आमचे आशिल यांनी टिपी स्किम नं. ४ फायनल प्लॉट नं. ११० चा फेर नं.८५०,८५१,२१८१ बाबत अंमलबजावणी करु नये व त्रयस्त व्यक्तीचा हक्क अधिकार हितसबंध निर्माण करु नये तसेच याबाबत आमचे आशिल योग्य त्या कोर्टात याबाबत दाद मागत आहे म्हणून त्याची जाणीव संबंधीत अधिकाऱ्यांना दिली असून कोणीही व्यक्तीने सदर फेर प्रमाणे मोनेश विरेंद्र लोढा किंवा कुटुंबातील कुठल्याही सदस्याबरोबर आमच्या आशिलाच्या संमतीविना मिळकत संदर्भात व्यवहार करु नये असा कुठलाही व्यवहार संबंधीत व्यक्तीने केल्यास त्यास क्लिअर टायटल व क्लिअर क्षेत्राचा मालकी हक्क, ताबा मिळणार नाही याची जाणीव ठेवावी, याबाबत आमच्या आशिलाने नगर रचनाकार, महाराष्ट्र शासन, महानगरपालिका तसेच अधिक्षक भूमी अभिलेख तसेच नगर भूमापक तसेच जिल्हाधिकारी यांना याबाबत आमच्या आशिलाने योग्य ती दखल घेण्याबाबत कळविले असे, तसेच संबंधित व्यक्तीची कुठल्याही प्रकारे फसवणूक होऊ नये म्हणून आमच्या आशिलाने या जाहीर नोटीसीद्वारे कळविले असे. नोटीस दिली असे.

दि. १/४/२०२६. अहिल्यानगर

**ॲड. विजय बी. मुनोत**
बी.कॉम., डी.टी.एल.,एलएलबी, जी.डी.सी ॲण्ड ए
ॲडव्होकेट ॲण्ड टॅक्स कन्सल्टंट, नोटरी पब्लिक (गव्हर्न.ऑफ इंडिया)
बारातोटी कारंजा, माळीवाडा,अहिल्यानगर, मो : ९८५०८७३१५३



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या विक्रीचा व्यवहार केलेला आहे. **सदर मिळकत हि विद्यमान मालक यांचे मालकीची असून** त्यांच्याच प्रत्यक्ष कब्जात व ताब्यात आहे. सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असा खरेदी देणाराने म्हणजेच विद्यमान मालकाने खात्री व भरवसा दिला आहे. तथापि कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि,सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बॅंक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीज, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसाचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. तसेच हरकत न कळवीता परस्पर वर्तमान पत्रातून जाहीर केलेल्या हरकतींची काही एक दखल घेतली जाणार नाही. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे, त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०१/०४/२०२६

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन :** जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर), पोटतुकडी नगरपैकी, तालुका नगरपैकी, **महानगरपालिका** हद्दीतील, **मौजे केडगांव** येथील **सर्व्हे नंबर ४७/१अ१ मधील** खालील वर्णनांची मिळकत–

| प्लॉट नंबर | क्षेत्रफळ चौ.मी. | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| ४३ | २१९.९४ | ९.०० मी रुंदीचा रस्ता | ९.०० मी रुंदीचा रस्ता | प्लॉट नंबर ४४ | प्लॉट नंबर ५० |
| ४४ | १४९.४० | प्लॉट नंबर ४३ | ९.०० मी रुंदीचा रस्ता | प्लॉट नंबर ४५ | प्लॉट नंबर ४९ |
| ४५ | १४९.४० | प्लॉट नंबर ४४ | ९.०० मी रुंदीचा रस्ता | प्लॉट नंबर ४६ | प्लॉट नंबर ४८ |
| ४६ | २११.०५ | प्लॉट नंबर ४५ | ९.०० मी रुंदीचा रस्ता | सर्व्हे नंबर ४७पैकी | प्लॉट नंबर ४७ |
| ४७ | २०६.१९ | प्लॉट नंबर ४८ | प्लॉट नंबर ४६ | सर्व्हे नंबर ४७पैकी | ९.०० मी रुंदीचा रस्ता |
| ४८ | १४९.४० | प्लॉट नंबर ४९ | प्लॉट नंबर ४५ | प्लॉट नंबर ४७ | ९.०० मी रुंदीचा रस्ता |
| ४९ | १४९.४० | प्लॉट नंबर ५० | प्लॉट नंबर ४४ | प्लॉट नंबर ४८ | ९.०० मी रुंदीचा रस्ता |
| ५० | २१९.९४ | ९.०० मी रुंदीचा रस्ता | प्लॉट नंबर ४३ | प्लॉट नंबर ४९ | ९.०० मी रुंदीचा रस्ता |
| ५१ | २०२.९४ | ९.०० मी रुंदीचा रस्ता | ९.०० मी रुंदीचा रस्ता | प्लॉट नंबर ५३ | प्लॉट नंबर ५२ |

सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री आशिष रामराव भोसले
रा. बेलवंडी बुद्रुक, श्रीगोंदा, अहिल्यानगर (अहमदनगर)

**ॲड.प्रणव सुधीर धर्माधिकारी, ॲड.सौ.नूतन प्रणव धर्माधिकारी**
मो : ९०२८००८२००, पत्ता : भंडारी सावज अपार्टमेंट, कोठी रोड, अहिल्यानगर (अहमदनगर)

